MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.
# दिशा

वर्ष चौदावे / अंक १२ / डिसेंबर २०१३

## संपादकीय

### जाहिरात आणि खर्च

खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण यांचा माणसाच्या मनोरचनेवर जो परिणाम झाला त्यातून अनेक मानसिक विकार समाजामध्ये बळावले. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही. अशा प्रकारच्या गोंधळलेल्या अवस्थेत 'मला पहा आणि फुले वहा' असा जाहिरातीचा सूर बाजारात ऐकू येऊ लागला. लायकीपेक्षा अधिक पैसा लोकांना मिळू लागला. या पैशाचे काय करायचे या प्रश्नाच्या चक्रव्यूहात आकर्षक बाजार तयार झाला. उपभोगक्ता वाद आणि बाजार यांच्यामध्ये जाहिरात हा एक घटक प्रभावी ठरत चालला. सामाजिक दर्जा आणि सामाजिक प्रतिष्ठा यासाठी जाहिरातीतील वस्तू विचार खरेदी करण्याची स्पर्धाच सुरू झाली. नवश्रीमंत वर्गाची पैसे खर्च करण्याची क्षमता वाढली. आम्ही म्हणू ती बिस्कीटे वापरा, आम्ही म्हणू ते बूट वापरा, असा आग्रह जाहिरातीतून अधोरेखित होत गेला. आपण काय घेत आहोत? कशासाठी घेत आहोत? त्याची आपल्याला गरज आहे का? यांतील एकाही प्रश्नाचे भान राहिले नाही. याचा इतका अतिरेक झाला की, व्यक्तींच्या वैयक्तिक जाहिराती देखील सर्व प्रकारच्या माध्यमांतून सामाजिक मनावर आढळू लागल्या. शिक्षणासारखी मूलभूत गोष्ट मोफत मिळाल्याने वाचलेला पैसा ध्येयहीन आणि मूल्यहीन अशा पद्धतीने उडवला जाऊ लागला. वीस पंचवीस वर्षात सुख, पैसा, खरेदी, दुकान अशा सर्व संकल्पना आमूलाग्र बदलल्या. एलिझाबेथ डन् आणि मायकेल नॉर्टन यांच्या 'हॅपी मनी सायन्स ऑफ हॅपी स्पेडींग' या पुस्तकात या विषयाचे विवेचन आढळते. जाहिरात या चौसष्टाव्या कलेचा महिमा वाढत गेला.

आकर्षक अशा दुकानांमधून गर्दी करणे, कोणत्या वस्तूचा भाव किती आहे याचा सारासार विचार न करता जाहिरातींना भुलून सामाजिक प्रतिष्ठेसाठी खरेदी करण्याचा प्रवाह आढळू लागला. घरी आणल्यावर हे सामान वापरले जातेच असे नाही. नंतर माणसाला आपण ही खरेदी का केली असा प्रश्न पडतो आणि खर्च झालेला सर्व पैसा वाया जातो.

एकीकडे गरिबीच्या नावाने रडायचे आणि दुसरीकडे पैसे उधळत रहायचे, अशी विसंगती समाजात आढळून यायला लागली. ही खरेदी यात्रा आणि जाहिरातीची तंत्रे माणसाला मानसिकदृष्ट्या कमकुवत बनवू लागली. मॉल

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

संस्कृती हे एक पूरक कारण आहे. समाजामध्ये असलेल्या मानसिक विकारांना हे वातावरण प्रोत्साहक ठरत चालले आहे. सामाजिक प्रतिष्ठेसाठी केलेली अनावश्यक खरेदी टाळावयाची असेल आणि पैशाचा सदुपयोग करावयाचा असेल तर तारतम्य ठेवावयास हवे. लायकीपेक्षा मिळणारा अधिक पैसा व्यसनांना आमंत्रण देतो आणि समाज व्यसनाधीन होतो.

जाहिरातींनी माणसाला गुलाम केले आहे. आकर्षक रंग, कल्पक सादरीकरण अशा बाबींमुळे माणूस सहजपणाने जाहिरातींच्या जाळ्यात अडकू लागला. या जाहिरातींचा प्रभाव पडून त्याचा परिणाम माजलेपणा, पैशाची गुर्मी यात झाला. आवश्यकतेपुरता खर्च करा, वाया घालवू नका देशातील अनेक नागरिक मूलभूत बाबींपासून वंचित आहेत ही शिकवण कालबाह्य ठरली. स्वातंत्र्यपूर्व काळात खर्च करताना पैसा हा विचार दृष्टीआड केला जात नसे; पण काळाबरोबर समाजातील सर्व विधायक संकल्पना मोडकळीस आल्या आणि चित्र पालटले.

जाहिरातीमागील मानसिकता आणि त्यातून निर्माण होणाऱ्या मनोविकारांचे कारण ही बाब चिंतेची ठरली आहे. अति जाहिरात करण्याच्या या प्रकारामुळे व सामाजिक प्रतिष्ठेसाठी तडजोडी करण्यामुळे समाजाची वाटचाल दिशाहीन होत चालली आहे. म्हणूनच खरेदीशास्त्राचे, उपभोग शास्त्राचे शिक्षण अबालवृद्धांना द्यायला हवे.

**– मोहन पाठक**

●●●

**भास्कराचार्यांच्या ९०० व्या**

**जन्म वर्षानिमित्ताने**

**आयोजित करण्यात येणाऱ्या**

**परिषदेचा तपशील**

**'विद्या प्रसारक मंडळ, दिशा'**

**च्या पुढील**

**अंकात वाचा...**

**दिशाचे जुने लेखक**

***श्री. यशवंत साने***

**यांची**

**नविन लेखमाला**

**पुढील अंकापासून...**

वर्ष चौदावे/अंक १२/डिसेंबर २०१३

वर्ष चौदावे/अंक १२ /डिसेंबर २०१३

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १८ वे/अंक ६वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. मोहन पाठक | |
| २) | अधर्म जेंव्हा धर्म होतो ! | डॉ. विजय बेडेकर | ३ |
| ३) | हर्टफर्ड कॉलेज | डॉ. सुधाकर आगरकर | ५ |
| ४) | मराठी ग्रंथसंग्रहालयाचा परिपूर्ण अभ्यास | श्री. मोहन पाठक | ७ |
| ५) | नर्मदा परिक्रमा<br>भाग : २ | सौ. मंगला अशोक वझे<br>श्री. अशोक माधव वझे | ९ |
| ६) | धर्म स्वातंत्र्य आणि अंधश्रद्धेविरुद्ध कायदा | श्रीमती अबोली देवधर | १७ |
| ७) | श्रीमत् भगवद् गीता - अध्याय अकरावा<br>विषय : विश्वरुप योग | कै. शं. बा. मठ | १९ |
| ८) | ग्रंथालय संगणकीकरण आणि<br>ग्रंथपालांची मानसिकता | प्रा. श्रीनिवास आठल्ये | २५ |
| ९) | कै. राजाभाऊ भावे-ठाण्याचे ''सत्वस्थ''<br>ज्ञानप्रेमी व्यक्तिमत्त्व | श्री. ह. श्री. परांजपे | २८ |
| १०) | सहकार क्षेत्राचं चांगभलं | प्रा. एम. डी. बनसोडे | ३२ |
| ११) | साहित्य-जगत | श्री. शरद जोशी | ३४ |
| १२) | परिसर वार्ता | संकलित | ३७ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ अभ्यासपूर्ण लेखांसाठी आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगी मूल्ये द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची देणगी मूल्य पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याच रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# अधर्म जेंव्हा धर्म होतो !

*सद्धर्म ऑक्टोबर, २०१३ मधील माननीय संपादक डॉ. विजय बेडेकर यांचे संपादकीय दिशाच्या वाचकांसाठी पुनमुद्रित करत आहेत – कार्यकारी संपादक*

भारतीयांची, विशेषतः हिंदूंची 'धर्म' संकल्पना वैशिष्ट्यपूर्ण आहे. धर्म आणि पंथ या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. प्रत्येक पंथाला एक प्रेषित व एक पंथग्रंथ असतो. त्या पंथाच्या लोकांना प्रेषिताची वचने आणि पंथ ग्रंथांच्या परिघातच रहावे लागते. धर्म हा कुठली एक देवता, उपासना पद्धती, विश्वास किंवा श्रद्धा यांना बांधलेला नसतो. अनेक देवता, उपासना पद्धती किंवा श्रद्धा, धर्म संकल्पनेत असू शकतात. ही विविधता मान्य करूनही व्यावाहरिक संतुलनाकरता सर्व समाज घटकांना काही जबाबदाऱ्या आणि नियमांचे पालन करावे लागते. समाज हा अनेक भिन्न वैचारिक क्षमता, वयोगट, भौगोलिक परीस्थिती, यांपासून बनलेला असतो. व्यक्तीला जेवढे स्वातंत्र्य असते, तोच अधिकार समूह किंवा समाजाच्या एकत्रित स्वातंत्र्याचाही असतो. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही, म्हणूनच जबाबदारी शिवाय स्वातंत्र्य अस्तित्वात असू शकत नाही. नीती, अनिती, चांगले, वाईट यांच्यातील सीमारेषा अस्पष्ट असतात. याचे मुख्य कारण म्हणजे, त्यांच्या संदर्भांची पार्श्वभूमी हे होय. हे संदर्भ सामाजिक, सांस्कृतिक किंवा उपासना पद्धतीचे आहेत. या सर्व भिन्न, व्यस्त व विरोधाभासी समूहामध्ये संतुलन आणण्यासाठी, मार्गदर्शन करण्याचे काम जी व्यवस्था करते तिला 'धर्म' असे म्हणतात. ''धारणात धर्ममित्या ह्युधर्म धारयेत'' असे त्याचे वर्णन करण्यात आले आहे. एकाकी न्यायापेक्षा जास्तीत जास्त (परिपूर्ण) न्याय देण्याचा प्रयत्न धर्म संकल्पनेत आहे. म्हणूनच स्वातंत्र्याबरोबरच नियंत्रणाचाही त्यात अंतर्भाव आहे. ही शिकवण (या शिकवणीचा) व्यक्तीच्या गर्भावस्थेतसुद्धा संस्कार करण्याचा प्रयत्न हिंदू धर्मात केला आहे. हा प्रयत्न म्हणजे संस्कारांच्या माध्यमातून व्यक्तीमध्ये 'विवेक' निर्माण करणे. याची कार्यशाळा, म्हणजेच दैनंदिन जीवन. आपले आई वडील, स्वकीय आणि समाजातील इतर महाजन हे अशा विवेकी वागणुकीचे उदाहरण घालून देतील, अशी अपेक्षा असते. व्यक्ती आपल्या संस्कारक्षम वयात, अशी जेवढी जास्त उदाहरणे अनुभवते, तेवढी ती अधिक सहिष्णु आणि संयमशील बनत जाते. आजची परिस्थिती बरोबर याच्या उलट आहे.

आजच्या हिंदूंचे 'सार्वत्रिक धार्मिक' सण साजरे करण्याची पद्धत बघितली तर समाज नुसताच दिशाहीन नाही, तर किती अभिरुची आणि संस्कारहीन, किती सडला आहे याची प्रचिती येते. ज्या नेतृत्वाने किंवा यंत्रणांनी यावर अंकुश ठेवायचा त्यांनीच या सणांना बाजार बनवण्याचा विडा उचलला आहे. राजकारणाचे गुन्हेगारीकरण झालेच आहे. आता सार्वत्रिक सण राजकारण्यांनी बिघडवले आहेत. दुर्दैवाने हे सर्व धर्म आणि श्रद्धेच्या नावाखाली चालू आहे. संघर्षमय जीवनामध्ये क्षणभर आनंद, विरंगुळा देण्याचे काम हे सण करीत असतात. शिवाय हे सर्व सण सर्वांनीच साजरे करावेत असाही हट्ट नव्हता.

उपासना सामूहिक होते, तेव्हा तिला सामावून घेण्याकरता देवळांची रचना होते. संपूर्ण विचार करूनच अशा देवळांची रचना करण्यात येत असे. छतापासून भिंतीपर्यंत कोरलेली शिल्पेही कलेइतकीच शिक्षणाची आधार होती. नृत्यापासून व्याकरणापर्यंतच्या अध्यापनाचे मंडप त्यात होते. विप्र होण्याची ती एक जागा होती. श्रद्धेएवढे संस्कारालाही तिथे स्थान होते. या सर्व देवळांचे आपण बाजारीकरण

---

पक्ष्यासारखे विहरावे, कोकिळेसारखे गावे, मोरासारखे नाचावे, माशासारखे पोहावे, अशी माणसाची इच्छा असते. त्याला माणसासारखे जगावे, अशी इच्छा मात्र होत नाही.

केलेच, पण तेही कमी पडू लागले की काय म्हणून, या राजकारण्यांनी या श्रद्धेचा रस्त्यावर व्यापार सुरू केला. काही अपवाद वगळता सगळ्याच माध्यमांनी भावुकतेचा बाजार मांडला. संशोधन तर सोडाच, पण कृष्णकाल्यापासून गणपतीपर्यंत भाकड कथांचे रतीब ही माध्यमे घालू लागली. ज्या देवांकरता अत्यंत ललित्यपूर्ण स्त्रोत्रे, आरत्या आणि पोवाडे रचले गेले, तेथे आता अत्यंत अचकट विचकट हिडीस नाच आणि गाणी यांचे कलेच्या नावाखाली प्रदर्शन होताना दिसू लागले. अर्थातच, आम्ही सिनेमा किंवा नाटक यांच्या माध्यमातून समाज प्रबोधन करत आहोत अशी व्यापारी बकवास करणारे नट व नट्याही आपला 'अर्थपूर्ण' हातभार याला लावतच आहेत.

याला राजकारणी जितके जबाबदार आहेत तेवढाच समाजही या घसरंडीला जबाबदार आहे. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी, देव भरला आहे, हे तत्त्वज्ञान सांगणारे हिंदू , एखादा विशिष्ट देव नवसाला पावतो, या शुद्घ थापेबाजीवर विश्वास ठेवत, तासनतास तेथे उभे राहतात या विरोधाभासला काय म्हणावे? सर्व आघाड्यांवर दिवाळखोर नेतृत्व आज आपण अनुभवत आहोत. सुधारणेच्या नावाखाली आम्ही धर्मग्रंथ जाळून टाकले, अवघ्या साठ पासष्ठ वर्षात शंभरवेळा बदलाव्या लागणाऱ्या आपल्या राज्यघटनेने आपल्याला काय पर्याय दिला, हे आपल्या समोर आहेच. आज आपण धर्मही घालवला आणि चारित्र्यही हरवले. राजकारण्यांनी समाजाला सवलत ग्रस्त करून, अधिकाधिक स्वार्थी करून ठेवले आहे. आपले आजचे सर्वाजनिक उत्सव हे त्याचेच प्रतिबिंब आहे. नीतिहीन समाजाचे नेतृत्व हेही नीतिहीनच असते, तेव्हा अधर्म धर्म झालेला असतो. आज त्याचीच प्रचिती आपणांला येत आहे.

**– डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष, वि.प्र.मंडळ,
ठाणे

●●●

## *विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर*



विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर,
ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये
एवढीच माझी इच्छा.
दु:खतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस, अशी माझी अपेक्षा नाही
दु:खावर जय मिळवता यावा,
एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं, एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंस,
मला तारावसं ही माझी प्रार्थना नाही.
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं
एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सात्वन केलं नाहीस तरी,
माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी,
एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा
दु:खाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये,
एवढीच माझी इच्छा.

**गुरुदेव रवींद्रनाथ टागोर**

जर आपण एखादी उत्तम गोष्ट शिकलात तर ती इतरांनाही शिकवा.

# हर्टफर्ड कॉलेज

*ऑक्सफर्ड मधील महाविद्यालये हा खरे तर मोठ्या ग्रंथाचा विषय आहे. डॉ. आगरकरांनी आपल्या खास शैलीत हर्टफर्ड कॉलेजचा करून दिलेला हा परिचय.*

ऑक्सफर्ड भेटीत एखाद्या कॉलेजला भेट देता आली, तर चांगले होईल अशी इच्छा सहलीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. ऑक्सफर्डमधील काही कॉलेजमध्ये शुल्क आकारून आत प्रवेश देतात. पण अशा पध्दतीने आत जाऊन आपल्या हाती फारसे लागत नाही. कॉलेजमधले लॉन आणि दगडी इमारती एवढेच आपल्याला बाहेरून पाहता येते. म्हणून औपचारिक परवानगी घेऊन एखाद्या कॉलेजमध्ये जाता आले तर चांगले; असा विचार आम्ही करीत होतो. योगायोगाने ऑक्सफर्डमध्ये शिकलेल्या भारतीय वंशाच्या एका व्यक्तीशी आमची ओळख झाली. तू कुठे शिकलास असे चिारले असता ''हर्टफर्ड कॉलेज'' असे उत्तर त्याने अभिमानाने दिले. ह्याचबरोबर कॉलेजबद्दल थोडी माहितीदेखील त्याने दिली. त्यावर कॉलेजला भेट देण्याची इच्छा आम्ही व्यक्त केली. तसे पाहता कॉलेजचे शिक्षण संपून त्याला बरीच वर्षे झाली होती. तरीही माजी विद्यार्थी म्हणून त्याला कॉलेजमध्ये प्रवेश होता. त्याचा उपयोग करून त्याने कॉलेजमधल्या आंतरराष्ट्रीय विभागात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना गाठले.

भारतातून विद्यार्थ्यांचा गट आलेला असून तो आपल्या कॉलेजला भेट देऊ इच्छितो, असे त्याने सांगितले. त्यांच्या विनंतीवरून आम्हांला भेटीची परवानगी मिळाली. ही भेट खरोखरच संस्मरणीय अशीच होती. ठरल्याप्रमाणे सकाळी नऊ वाजता आम्ही हर्टफर्ड कॉलेजच्या प्रवेश द्वारापाशी पोहचलो. आंतरराष्ट्रीय विभागात काम करणारी एक बाई आमची वाटच पाहात होती. तिने आमचे स्वागत केले आणि एका सभागृहात नेले. तेथे चित्रफितीच्या मदतीने तिने आम्हांला कॉलेजची माहिती दिली. हर्टफर्ड नावाच्या दानशूर व्यक्तीने कॉलेज उभारण्यासाठी मोठी देणगी दिली, म्हणून त्याचेच नाव या कॉलेजला देण्यात आले आहे. तेराव्या शतकात या कॉलेजची स्थापना करण्यात आली. ज्या दगडी इमारतीत आम्ही बसलो होतो, ती ७०० वर्षाहून जुनी आहे. ही जागा अपुरी पडायला लगली म्हणून बाजूलाच नवीन इमारत बांधली. ती रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला असल्याने एका इमारतीतून दुसऱ्या इमारतीत जाण्यासाठी एक पूल बांधावा लागला. न्यू ब्रीज म्हणून हा पूल ऑक्सफर्ड शहरात प्रसिध्द आहे.



**कॉलेजची दगडी इमारत**



**न्यू ब्रिज : हर्टफर्डच्या दोन इमारतींना जोडणारा पूल**

जीवनात अर्थ निर्माण करण्याचे शास्त्र म्हणजेच धर्म.

जुन्या काळात धर्माचा पगडा बराच होता. त्याचबरोबर अनेक कॉलेजमध्ये धार्मिक शिक्षण देऊन धर्मप्रसारक निर्माण करण्याचे काम केले जायचे. त्यामुळे त्या काळात बांधलेल्या प्रत्येक कॉलेजमध्ये एक स्वतंत्र असे चॅपेल आहे. ते दाखविण्यासाठी आम्हांला नेण्यात आले. चॅपेल म्हणजे एक छोटेखानी चर्च असते. कोणत्याही चर्चमध्ये असतात, तशाच सुविधा येथेही असतात. थोडावेळ चॅपेलचे निरीक्षण करून आम्ही बाहेर पडलो व परिसराचे निरीक्षण करू लागलो. दगडी इमारतीत वर्गखोल्या बांधलेल्या असून त्यामध्ये अध्यापनाचे काम चालू होते. त्यांना त्रास नको म्हणून आम्ही आमचा मोर्चा विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाकडे वळविला. लहान लहान खोल्यांचे ते वसतिगृह विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी लागणाऱ्या सर्व सुविधांनी सुसज्ज असेच होते. प्रत्येक खोलीत एकाच व्यक्तीची सोय केलेली असून त्याला लागणारे टेबल, पुस्तकांचे कपाट, लँप इत्यादींची सुविधा होती. सध्या सर्वच विद्यार्थी संगणकाचा वापर करतात. त्यांना सोयीचे व्हावे, यासाठी त्यांच्या खोलीत पुरेसे विजेचे कनेक्शन दिलेले आढळले.

हर्टफर्ड कॉलेजच्या भेटीतील सर्वांत लक्षात राहिलेली गोष्ट म्हणजे दुपारचे जेवण. कॉलेजमध्ये निवासाची व्यवस्था असल्याने जेवणाची सोय असते. संध्याकाळचे जेवण केवळ वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच असते. परंतु दुपारचे जेवण मात्र विद्यार्थ्यांबराबरच कॉलेजमधील प्राध्यापक, त्यांचे मार्गदर्शक या सर्वांसाठी असते. विद्यार्थी आणि शिक्षकांची अनौपचारिक वातावरणात भेट व्हावी आणि त्यांच्यात संवाद निर्माण व्हावा यासाठी ही व्यवस्था केलेली असते. त्या दिवशी आम्हांलादेखील दुपारच्या जेवणाचे आमंत्रण दिले होते. कॉलेजमधील विद्यार्थी आणि शिक्षकांशी आम्हांला चर्चा करता यावी यासाठी ही व्यवस्था करण्यात आली होती. आम्ही सर्वांनी आपापले ताट घेऊन वेगवेगळ्या ठिकाणी बसावे अशी सूचना करण्यात आली. त्यानुसार प्रत्येकाने आपल्याला सोयीचे असे ठिकाण निवडले. त्यामुळे जेवणाच्यावेळी केवळ पोटालाच नव्हे तर बुध्दीलादेखील खाद्य मिळत होते.

संधी साधून मी एका प्राध्यापकाच्या शेजारची जागा पटकाविली. त्यामुळे जेवण संपेपर्यंत त्या प्राध्यापकाशी मी चर्चा करू शकलो. त्या कॉलेजमध्ये अर्थशास्त्र शिकविण्याचे काम ते करतात. त्याचबरोबर ५ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची त्यांच्यावर जबाबदारी आहे. त्यांच्याकडून ऑक्सफर्ड मधील कॉलेजच्या कामाविषयी माहिती मिळाली. येथील कॉलेजमध्ये अतिशय सहकार्य आहे. प्रत्येक कॉलेज आपले काही विभाग विकसित करते. त्यामुळे त्याच्याकडे त्यांच्या कॉलेजखेरीज इतर कॉलेजमधील विद्यार्थीदेखील येतात. शिक्षणासाठी विद्यार्थ्यांनी कोणत्याही कॉलेजमध्ये जावे, राहायला मात्र त्याने आपल्याच कॉलेजात यावे. तेथील मार्गदर्शक विद्यार्थ्यांच्या अडीअडचणींचा विचार करून मार्गदर्शन करीत असतात. याचे कारण ऑक्सफर्ड विद्यापीठातील शिक्षण बव्हंशी स्वयंअध्यनावरच आधारलेले आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला एक प्रकल्प दिलेला असतो किंवा अभ्यास दिलेला असतो. वर्गात त्यावर साधकबाधक चर्चा होते. आपल्याकडे प्राध्यापक जसे व्याख्यान देतात तसे तेथे केले जात नाही. विद्यार्थ्यांना काय कळले नाही, त्यांना कोणती अडचण आहे यावर चर्चा होते. या पध्दतीतून विद्यार्थी आपल्या पायावर उभे राहतात. म्हणूनच ते नवनिर्मिती करू शकतात. अशी शिक्षणाची पध्दत आपल्याकडे कधी येईल कोणास ठाऊक?

**– डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे – ४२१२०४

●●●


पुस्तक परिचय

# मराठी ग्रंथसंग्रहालयाचा परिपूर्ण अभ्यास

*एका महत्त्वाच्या संशोधनाच्या इंग्रजी अनुवादाचा हा परिचय – संपादक*

एखाद्या भरीव कार्य केलेल्या ग्रंथालयासारख्या संस्थेच्या प्रदीर्घ इतिहासावर विद्या वाचस्पती (पीएच. डी.) या पदवीसाठी संशोधन करणे हे मुळात एक आव्हानच म्हणावयास हवे संशोधने होतात, प्रबंध लिहिले जातात व ते वाळवीच्या भक्ष्यस्थानीही पडतात. समाजाला ज्या संशोधनांचा खरा उपयोग होईल, जे संशोधन समाजाला, त्यातील व्यक्ती व संस्थांना मार्गदर्शक ठरेल अशी संशोधने अत्यंत अपवादात्मक आहेत.

रुपारेल महाविद्यालयाचे व्यासंगी ग्रंथपाल साहित्य आणि ग्रंथालयशास्त्राची सखोल जाण असणारे डॉ. प्रदीप कर्णिक यांनी मुंबईच्या अतिशय महत्त्वाच्या अशा मराठी ग्रंथसंग्रहालयावर आणि संग्रहालयाच्या शैक्षणिक व साहित्यिक योगदानावर केलेल्या अभ्यासावर पीएच.डी. प्राप्त केली. पुणे विद्यापीठांतर्गत ग्रंथालयशास्त्र विभागाचे संशोधन मार्गदर्शक डॉ. शरद गणपुले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हा अभ्यास केला. संशोधन म्हटले की, कष्ट करण्याची अमाप तयारी लागते. त्यांच्या संशोधन काळात मी अतिशय जवळून त्यांचे कष्ट व त्यांचा अभ्यास पाहिला आहे. या कामी माझ्या अल्प बुद्धीनुसार आणि क्षमतेनुसार मी त्यांना खारीचा वाटा या स्वरूपात मदत केली होती.




त्यांच्या या संशोधनावर आधारित व त्यांच्या मूळ मराठी भाषेतील प्रबंधाच्या आधारे 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय : द प्राइड ऑफ मुंबई' हा ग्रंथ त्यांनी सिद्ध केला. या ग्रंथात एकूण दहा प्रकरणांमध्ये संग्रहालयाचा इतिहास, कार्ये, ग्रंथालयाच्या सेवा, ग्रंथालयातील ग्रंथविषयक सेवा, ग्रंथालयेतर चळवळी, अनौपचारिक शिक्षण, संग्रहालयाचा सांस्कृतिक व साहित्यिक विकास, संग्रहालयाचे यश व अपयश अशी प्रकरणे आली आहेत. या प्रबंधासाठी कर्णिकांनी ज्या ग्रंथ व ग्रंथेतर साहित्याचा संदर्भासाठी उपयोग केला त्याची यादी पृ.२०९ ते पृ.२३० इतकी मोठी आहे. J. H. Shera यांची त्यांनी वापरलेली 'लायब्ररी अ‍ॅड ऑर्गनायझेशन ऑफ नॉलेज' या ग्रंथातील अवतरणे पृ. ५४ वर वाचावयायस मिळातात. हे नाव किती महत्त्वाचे आहे हे ग्रंथालयशास्त्रातील अभ्यासकांना सांगावयास नको. ग्रंथसंग्रहालयाचा इतिहास लिहिताना त्यांनी विकासातील ऐतिहासिक कालखंडाचे वर्गीकरण केले आहे. यशवंत क्षीरसागर आत्माराम शिंदे व बाप्पा कुणेकसकर यांनी सुमारे ४५ वर्षे बाल संग्रहालयाची चळवळ चालवली होती. पृ. १८ ते पृ.४२

जो इतरांविषयी वाईट चिंतितो तो स्वतः कधीही सुखी होऊ शकत नाही.

या दुसऱ्या प्रकरणात संग्रहालयाच्या इतिहासातील सर्व बारकावे डॉ. कर्णिक यांनी साक्षेपीपणाने दिले आहेत. पृ. ३१ वर ग्रोथ अँड माइल स्टोन या प्रकरणाच्या शेवटच्या भागात संग्रहालयाच्या स्वतःच्या जागेत आल्या नंतरच्या सर्व महत्त्वपूर्ण घटना आणि त्या घटनांमधील व्यक्तींची नावे, इसवी सन हे तपशील कालक्रमानुसार तपशीलात दिले आहेत. शारदोत्सव व्याख्यानमाला, हेमंत व्याख्यानमाला या व्याख्यानमालांचे संबंध तसेच फिरत्या ग्रंथालयाची सेवा १९४६ साली सुरू केली. बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्पण' या वृत्तपत्रातील निवडक लेखांचे पुस्तक हे १९४६ साली प्रकाशित केले. हे संग्रहालयाचे पाहिले प्रकाशन होते. संग्रहालयाच्या सुवर्णजयंतीचा कार्यक्रम १९४९ साली पंधरा दिवस झाला. या निमित्ताने मराठीतील दोलामुद्रितांची सूची यावेळी प्रकाशित करण्यात आली. याचवर्षी मराठी संशोधन मंडळ सुरू झाले. हा सर्व ऐतिहासिक तपशील देताना तो विशिष्ट कालखंड व त्या त्यावेळच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्व असणाऱ्या व्यक्ती आपल्या डोळ्यांसमोरून एखाद्या चित्रपटाप्रमाणे उलगडत जातात.

तिसऱ्या प्रकरणात (पृ.४३ ते ५३) संग्रहालयाची विविध कार्ये नेमकेपणाने वर्णन केली आहेत. चौथ्या प्रकरणात ग्रंथालयाच्या अंतर्गत सेवांची माहिती व तिचा तपशील देण्यात आला आहे. पाचव्या प्रकरणात गेल्या शंभर वर्षात संग्रहालयाने आयोजित केलेल्या व्याख्यानमाला, नैमित्तिक भाषणे, निंबधांचे सादरीकरण, चर्चा, परिषदा व कार्यशाळा यांची समग्र माहिती आहे. यासर्व कार्यक्रमांमधून श्रोता व वक्ता यांच्यात होणारा विद्वत्तापूर्ण संवाद आणि त्यानिमित्ताने संग्रहालयात येऊन गेलेल्या विद्वान व्यक्तींची माहिती येते. त्यात वापरलेले दोन्ही तक्ते यादृष्टीने उपयुक्त आहेत. संग्रहालयाची सूची सेवा व त्या संबंधातील प्रकल्प यांची अतिशय उपयुक्त माहिती पुढील प्रकरणात आहे. जी या विषयात संशोधन करणाऱ्या अभ्यासकांना अतिशय मोलाची ठरेल. अनौपचारीक शिक्षण व विस्तारित सेवा यांची माहिती दिल्यानंतर नव्या प्रकरणात या संशोधनाचा मूळ गाभा असणारे प्रकरण ९ येते. सांस्कृतिक व साहित्यिक विकास आणि संग्रहालय १० व्या प्रकरणात संग्रहालयाच्या वाटचालीचे विवेचक मूल्यमापन केलेले आहे. यातील पृ.२०४ ते २०८ यामध्ये स्वॉट अॅनेलिसिस देण्यात आले आहे.

केवळ मैत्रीच्या नात्याने नव्हे तर तटस्थ राहून या ग्रंथाचा मी विचार करतो तेव्हा मला असे जाणवते की डॉ. कर्णिकांनी एका अतिशय महत्त्वाच्या विषयाचा केलेला हा परिपूर्ण असा अभ्यास आहे. महाराष्ट्राच्या गेल्या शंभर सव्वाशे वर्षांतील साहित्यिक सांस्कृतिक आणि विचारवंतांच्या कार्याचा तपशील देणारे असे हे संशोधन आहे. डॉ. कर्णिक यांना मिळालेले गणेश विष्णू खटखटे-रोणई हे पारितोषिक किंवा राजमाता पार्वतीदेवी भोसले यांच्या नावाने देण्यात आलेला ग्रंथमित्र हा पुरस्कार हा खरे तर त्या पुरस्काराचा सन्मान आहे.

सदर ग्रंथ डिम्पल प्रकाशनाने प्रकाशित केलेला आहे. मुखपृष्ठावर अंबादास पुणतांबेकर व वा. वि. भट यांच्या छायाचित्रांच्या पार्श्वभूमीवर संग्रहालयाच्या इमारतींचे छायाचित्र आहे. मुखपृष्ठावर हस्तालिखितांचे छायाचित्र तर मलपृष्ठ २ व ३ वर जुन्या मुंबईची आठवण करून देणारे देखणे निसर्ग चित्र आहे.

- Mumbai Marathi Granth Sangrahalaya - The Prideot Mumbai
- Karnik, Pradip L.
- मुंबई, डिंपल प्रकाशन २०१२
- पृ. २४८, मूल्य रु. २६०/-

**- मोहन पाठक**

ठाणे

●●●

ज्या गोष्टींचे ज्ञान नाही त्याबद्दल बोलू नये.

# नर्मदा परिक्रमा

**भाग : २**

*नर्मदा परिक्रमा हे एक आव्हान असते. आमचे स्नेही श्री. अरविंद ओक व सौ./श्री. वझे यांनी या परिक्रमेचा अनुभव घेतला. या परिक्रमेतील अनुभव, निरीक्षणे व चिंतन यावर आधारित लेखमालेतील हा दुसरा लेख. - संपादक*

निसर्गाच्या बाबतीत निरीक्षण करावयाचे झाले तर महाराष्ट्रापेक्षा सुमारे दहा पट जंगले अजूनही तेथे आहेत. या जंगलांतून ७०-८० टक्के तर सागाचीच झाडे आहेत. या जंगलांतून असंख्य माकडे आहेत. असंख्य प्रकारचे पक्षी आहेत. असंख्य श्वापदे आहेत असे समजले होते, परंतु आम्हांला त्यांचे दर्शनही झाले नाही. रात्रीच्या मुक्कामात शेजारी एखादे शेत असेल तर कोल्हेकुई ऐकू यायची एवढेच. काही ठिकाणी अत्यंत भीतिदायक जंगले असून सुद्धा नर्मदा मैय्याची परिक्रमा हे एकमेव ध्येय समोर असल्यामुळे व कदाचित या श्वापदांनाही नर्मदा मैय्याबद्दल आदर असल्यामुळे आम्हांला काही त्रास झाला नाही. अत्यंत आनंदात व सुखाने या जंगलांतूनही आमची परिक्रमा पूर्ण झाली.



**मंदिरे**

नर्मदा मैय्येच्या पाण्याबद्दल इथे विशेष उल्लेख करावासा वाटतो. नर्मदेचे पाणी पवित्र का मानले जाते. याचा उल्लेख अगोदरच आलेला आहेच. परंतु या नदीचे पाणी नितळ, सुंदर व स्वच्छ का? याचा विचार जेव्हा येतो तेव्हा त्याचे सारे श्रेय नर्मदा स्वच्छता अभियान यासाठी काम करणाऱ्या सर्व तरुणांना जाते. जेथे जेथे घाट बांधून स्नानाची व्यवस्था केलेली आहे त्या त्या ठिकाणी स्वच्छता राखण्याचे बॅनर्स-पोस्टर्स तर लावलेली आहेतच शिवाय छोट्या छोट्या ग्रुपने नर्मदा स्वच्छता अभियानव चे महत्त्व समजावून दिले जात आहे. पात्रात मोठ मोठी जाळी टाकून पाण्यातून वाहत येत असलेला कचरा नदीपासून लांब नेऊन त्याचे खत केले जाते. प्रवासात कोठेही प्लॅस्टिकच्या पिशव्या दिसल्या नाहीत. किनाऱ्यावर बाभळीच्या मोठ्या झाडांवर प्लॅस्टिक किंवा अन्य कचरा दिसला. नर्मदेला जेव्हा पूर येतो तेव्हा किनाऱ्याच्या शहरांतून प्लॅस्टिक किंवा अन्य कचरा वाहत येतो, तो हा कचरा आहे असे समजले. परिक्रमा मार्गात दर अर्ध्या किलोमीटरवर किंवा एक एक किलोमीटरवर सरकारने बोअरिंग करून हँडपम्पस् बसवलेले आहेत. अगदी जंगलातून सुद्धा हँडपंम्पस्ना शुद्ध आणि स्वच्छ पाणी आहे. हेच पाणी आम्ही आमच्या १२८ दिवसांच्या नर्मदा परिक्रमेत पिण्यासाठी सुद्धा वापरत होतो.

---

यशाच्या शिखरावर असताना आपण लोकांना विसरतो, अपयशात असताना ते आपल्याला विसरतात.

नर्मदा मैय्या म्हणते, तू एक पाऊल पुढे टाक बाकीची सर्व पाऊले मी तुझ्या बरोबर आहेच. या नर्मदा परिक्रमेत पदोपदी असे काही अनुभव येतात की आपण ज्या शहरात सध्या रहातो त्या ठिकाणी सहसा अनुभवता येत नाहीत. यांतील काही निवडक अनुभव येथे नमूद करावेसे वाटतात. नर्मदा परिक्रमेला घरातून निघण्यापूर्वी याची चुणुक अनुभवयला मिळाली. काही महिने घर बंद रहाणार होते, म्हणून फ्रीझही बंद ठेवणार होतो. त्यातील वस्तूंची आवरा आवर करण्याच्या दृष्टीने बहुतेक वस्तू शेजारी ठेवायला दिल्या. नंतर असे लक्षात आले की त्यातील ड्रायफ्रूटस्‌ची पाकिटे बरोबर घेतली असती तर वाटेत उपयोगी पडली असती. पण आता जाऊदे. परत कुठे मागणार अस मनात यायला आणि दीड दोन तासानी आम्हा दोघांच्याही परिचयाच्या बाई दोन ड्रायफ्रूटस्‌चे पुडे घेऊन आल्या.पहिलीच इच्छा पूर्ण करून नर्मदा मैय्याने पहिलाच आश्चर्याचा धक्का दिला. परिक्रमेसाठी घरून निघालो. कल्याण रेल्वे स्टेशनात गाडीत बसलो. सकाळीच खांडवा स्टेशनला उतरलो. पुढे ओंकारेश्वरला बसने जावयाचे होते, म्हणून बसमध्ये बसलो. तिथल्या बस थोड्याशा उंच आहेत बसमध्ये चढताना काही वाटले नाही. परंतु उतरताना पाठीवरील सॅक बसच्या पायरीला लागायला लागली. बस कंडक्टरने माझी अडचण ओळखली. बसमध्ये पुढे होऊन तो म्हणाला बाबाजी वो झोला मेरे पास दीजिये, आप उतरनेके बाद मैं आपको देता हूँ। व त्याप्रमाणे मी खाली उतरलो. बस कंडक्टरने अत्यंत अदबीने माझी सॅक मला दिली आणि नमस्कार करत म्हणाला नर्मदेहरव! केव्हढे हे सौजन्य! सहजच मनात आले. महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी सरकारी बसमधून अनेक भाविक यात्रा करीत असतात. त्यांना अशी वागणूक कधी मिळेल?

ओंकारेश्वरला संकल्प करून परिक्रमा सुरू झाली आणि पहिल्याच रात्रीच्या मुक्कामाला जेवण मिळाले. ते खूप तिखट होते. आम्हांला तिखट खायची सवय नाही, थोडेसे चिंतेत होतो. उद्या आपल्याबरोबर साखर किंवा गूळ घेतला पाहिजे या विचाराने झोपलो. दुसऱ्या दिवशी एका आश्रमात गेलो. येथील साधुबाबांची महती म्हणजे एका पायावर बारा वर्षे उभे राहून त्यांनी तपश्चर्या केलेली आहे. त्यांनी थांबवून आम्हांला सदावर्त म्हणून खिचडीचे साहित्य, बिस्किटे पुडे, उदबत्तीचे पुडे, काडेपेटी, तुपाच्या डब्या आणि साखरेची पुडी दिली. मनात आले जेवण तिखट लागले म्हणून काळजीत होतो; म्हणूनच साखरेची व्यवस्था मैय्यानेच केली. तुपाची डबी, उदबत्तीचे पुडे, काडेपेटी यांचे प्रयोजन काय? काही लक्षात येईना. संध्याकाळी मुक्कामाच्या ठिकाणी स्नान करून नर्मदा मैय्याच्या पुजेला सुरुवात करणार, तोच एक ८०-८५ वर्ष वयाचे गृहस्थ फुलवाती घेऊन आले. दुपारी मिळालेल्या उदबत्या, काडेपेटी, तुपाच्या डब्या यांचा उलगडा झाला. आम्ही आमच्याबरोबर नर्मदा मैय्याच्या पूजेसाठी काहीच सामान बरोबर घेतलेले नव्हते. मैय्यानेच पूजेसाठी सर्व सामान पुरविले. आतातरी साग्रसंगीत आरती करा, असाच जणू संदेश दिला! सर्वच अकल्पित!

असेच आम्ही एकदा दुपारी २-२.३० च्या सुमारास एका शेतातून चाललो होतो. समोरून एक तरुण सायकलवरून येताना दिसला. त्याला थांबवून विचारले, 'पुढचे गाव किती लांब आहे? चहाची, जेवणाची, रात्रीच्या मुक्कामाची काही सोय आहे का?' त्यावर तो म्हणाला, पुढे एक गाव आहे ते थोडेसे लांब आहे. त्याच्या पुढचे गाव खूपच लांब आहे. आत्ता येईल त्या गावात तुम्ही मुक्काम करा. रात्रीच्या मुक्कामाला गावात श्रीराम मंदिर आहे. गावात हॉटेल वगैरे काहीही नाही. पण तुम्ही चिंता करू नका, तुमची सगळी व्यवस्था होईल. संध्याकाळी त्या गावात पोहचलो. श्रीराम मंदिरात मुक्काम केला. स्नान, कपडे धुणे आटोपले, तेव्हढ्यात शेजारच्या घरातून न मागताच चहा आला. नर्मदा मैय्याची पूजा झाली.

श्रीराम मंदिरातली आरती झाली आणि एक लहानसा मुलगा आम्हांला आग्रहाने भोजनासाठी बोलावू लागला. त्याच्या आग्रहाचा मान ठेवून त्याच्या घरी आम्ही जेवयाला गेलो. बघतो तर काय! पाट, ताट त्याभोवती सुंदर रांगोळी काढलेली होती. पंचपक्वान्नांनी ताट भरलेले होते. घरातले सर्वच आग्रहाने जेवण वाढत होते. अगदी ८० वर्षाच्या वृद्ध माताही जेवणाचे पदार्थ वाढत होत्या. जेवण वाढताना सर्व समाधानी वाटले. जेवणानंतर गप्पांच्या ओघात आम्हांला कळले की सायकलवरून दुपारी जो तरुण आम्हांला भेटला होता त्याचेच हे घर होते. काही कामानिमित्त आज त्याला दुसऱ्या गावात मुक्काम करावा लागणार असल्यामुळे फोन करून त्याने आपल्या घरी नर्मदा परिक्रमावासी येत आहेत, त्यांची भोजनाची व्यवस्था करण्याबद्दल सूचना दिल्या होत्या आणि त्यामुळेच आजच्या रात्रीच्या भोजनाची व्यवस्था. केवढी ही नर्मदा मैय्याच्या परिक्रमावासियांबद्दल श्रद्धा! सर्वसाधारणपणे नर्मदा परिक्रमेत रात्रीच्या मुक्कामाची व्यवस्था एखाद्या घराच्या पडवीत, आश्रमात, देवळात, धर्मशाळेत किंवा शाळेतील खोल्यांतून होते. एखाद्या घराच्या पडवीत, आश्रमात, देवळात जर व्यवस्था झाली तर संध्याकाळचा चहा, रात्रीचे जेवण, आंथरूण-पांघरूण, सकाळची चहाची व्यवस्था त्या घरातील किंवा शेजारच्या घरातील सदस्य सर्व काही सेवावृत्तीने करण्यात धन्य मानतात. परिक्रमा मार्गातील सर्व सरकारी शाळांतून एक रिकामी खोली असते. त्यात चूल असते. लाकूडफाटा असतो. गोवऱ्या, म्हणजे स्थानिक भाषेत कंडे असे म्हणतात. त्याची व्यवस्था असते. तुमची स्वतःची जेवण बनवून जेवणाची तयारी करावयाची असेल तर शेजारच्या घरातून भांडीही मिळतात. अशाच एका शाळेतील खोलीतील मुक्कामात संध्याकाळचा चहा, रात्रीचे जेवण, आंथरूण-पांघरूण याची व्यवस्था शेजारच्या घरातून झाली होती. सकाळी आंथरूण पांघरूण परत देण्यासाठी निघालो तर माझी पत्नी मला म्हणाली, अहो चहाची व्यवस्था कोठे होते का तेही पाहून या. आंथरूण पांघरूण परत करण्यासाठी खोलीतून बाहेर पडलो आणि फाटकापाशी आलो. समोरून एक महिला येताना दिसली. तिला चहाची व्यवस्था कुठे होईल का? असे विचारले. तिने हातातील किटली दाखवत सांगितले की, आपके लियेही मैं चाय लेकर आयी हूँ. लिजीये असे म्हणत गरमा गरम चहाची किटली माझ्या हातात दिली. आश्चर्याने मनात म्हणालो हिला कसे कळले की आम्हांला चहा पाहिजे ते? मैय्यानेच सर्व व्यवस्था केलेली असते हे खरे. असेच एकदा एका गावातून चाललो होतो. बाजाराचा दिवस होता. दुकानातल्या इलेक्ट्रॉनिक वजन काट्याकडे बघून वाटले परिक्रमा सुरू करून एक महिना झाला आहे. वजन किती कमी झाले आहे ते पाहू या. दुकानदारांच्या परवानगीने त्या वजन काट्यावर उभे राहिलो. माझे वजन सात किलो पत्नीचे वजन तीन किलो कमी झालेले होते व माझ्या मित्राचे वजन चार किलोने कमी झालेले होते. थोडेसे पुढे गेलो तर एका घरातून एका महिलेने आदराने बोलाविले. चहापाणी दिले व निघताना चार चार पौष्टिक लाडू दिले. मनात आले, मैय्या म्हणते वजन कमी झाले आहे काही चिंता करू नका. पौष्टिक लाडूची व्यवस्था केलेली आहे. धन्य ती मैय्या! असेच एकदा एका गावातून निघालो. दुपारची वेळ होती. नव्याने रस्ता करण्याचे काम चालू होते. चहापाणी किंवा खाण्यासाठी काही मिळेल का? या आशेने एखादी वस्ती बघत होतो. पाठीवरच्या सॅकमध्ये थोडेसे खाणे होते. परंतु जवळचे पाणी संपले होते. चालत होतो, चालत होतो. वरून उन व पायाखाली उजाड रस्ता. एवढ्यात एक तरुण मुलगा मोटार सायकलवरून येत होता. आम्हांला बघून तो थांबला. आमची चौकशी केली. थंड पाणी पाहिजे का? म्हणून विचारले, पाणी तर आम्हांला हवे होतेच. गप्पांच्या ओघात तो सेकंड शिफ्टला कामावर चालल्याचे कळले. त्याने आपल्या जवळचे डब्यातले

जे श्रीमंताच्या बंगल्यावरही पडते आणि गरिबाच्या झोपडीवरही पडते, अशा चांदण्यासारखे राहा.

ताजे ठेपले जे त्याच्या आईने त्याच्यासाठी कामावर जाताना म्हणून दिले होते, ते सर्व आम्हांला दिले. आम्ही संकोचत आहोत हे पाहून तो पुढे म्हणाला, माझी काळजी करू नका. रात्री कामावर कँटीनमध्ये काहीतरी खाईन. तुम्ही हे आनंदाने घ्या. मला माहीत आहे की या १०-१२ किलोमीटरच्या परिसरात तुम्हांला काहीच मिळणार नाही. नर्मदा परिक्रमावासियांची अडचण ओळखून आपल्या जवळचे खाणेपिणे परिक्रमावासियांना देणारे धन्य ते काठचे रहिवासी. असेच एकदा नर्मदा परिक्रमेतील प्रवासात सकाळी ज्या गावातून निघालो, त्या गावात चहा नास्ता मिळाला. पुढे दुपार पर्यंत वाटेत गाव किंवा वस्ती लागली नाही. दुतर्फा उसाची लांबच लांब शेती लागली. दुपारच्या जेवणाच्या चिंतेत होतो. वाटेत उस घेऊन जाणाऱ्या बैलगाड्या दिसल्या. त्यांच्या गाडीवानांकडून समजले की पुढे नर्मदा साखर कारखाना आहे. त्याच्या समोर काही टपऱ्या आहेत. तेथेच काहीतरी खायला प्यायला मिळू शकेल. तेथे पोहचल्यावर बघतो तर सर्व ठिकाणी मांसाहारी जेवण उपलब्ध होते. आता आली पंचाईत, सहज म्हणून नर्मदा साखरकारखान्याच्या रखवालदाराला विचारले. तो म्हणाला, आतमध्ये साखर कारखान्याचे कँटीन आहे, तेथे विचारून बघा. आत गेलो तर कँटीन मॅनेजरने स्वागत केले व आनंदाने जेवण दिले व त्याबद्दल त्याने पैसेही घेतले नाहीत व नम्रतेने म्हणाला याच परिसरात नर्मदामैय्याचे देऊळ आहे, ते अवश्य पहा. ते देऊळ पाहतो तर, देऊळ आतून बाहेरून संपूर्णपणे संगमरवरी व सुरेख बांधणीचे तर आहेच. पण आतली नर्मदा मैय्याची मूर्ती तर अप्रतिम सुंदर आहे. देऊळ व आतली नर्मदा मैय्याची मूर्ती पाहून अतिशय प्रसन्न वाटले. जणू नर्मदा मैय्याने आपल्या घरीच जेवायला बोलावले याचा आनंद काही वेगळाच होता.

वाटेने जाणारे येणारे 'नर्मदे हर' म्हणतातच पण मोटारसायकलवरून जाणारे, गाडीने जाणारे मोटारसायकल किंवा गाडी थांबवून आमच्या पायात बूट असून सुद्धा स्वतःच्या पायातले बूट चपला काढून चक्क पायावर डोके ठेवतात व ५० रुपयाच्या १०० रुपयाच्या नोटा काढून देताना पाहून आम्ही संकोचत होतो. आमची परिक्रमा पैसे मिळवण्यासाठी नाही हे सांगून सुद्धा ते म्हणायचे 'आपको ये हम नही दे रहे है. आपको हम घर नही लेके जा सकते है, घर बहुत दूर है. आप कही भी मैय्याको फूल या अगरबत्ती चढाना.' थक्क करणारा हा विश्वास अर्थातच नर्मदा मैय्यामुळेच. एकदा तर लाल पिवळ्या दिव्याच्या गाडीतून चारपाच जण उतरले. आम्हांला थांबवून चौकशी केली व आमच्या पायावर डोके ठेवले. त्यातले एक गृहस्थ म्हणाले,'मी अमरकंटक येथील न्यायालयात जज्ज आहे व माझ्या बरोबरचे हे सगळे अंगरक्षक आहेत.' त्या सर्वांनी १००-१००रुपयाच्या नोटा आग्रहाने दिल्या व पुढे म्हणाले, 'गेले चार दिवस मी तुम्हाला चालत परिक्रमा करताना बघतो आहे. आमच्या भागातले परिक्रमावासि या रस्त्याने चालत नाहीत, ते कुठल्यातरी वाहनाची मदत घेतात व पुढे जाऊन असे समजले की या भागातील घरटी एकाने तरी नर्मदा परिक्रमा केली पाहिजे, ही परंपरा आहे किंवा अलिखित नियम आहे. त्यामुळे, त्यांची नर्मदा परिक्रमा म्हणजे तीर्थाटन असते. मधला प्रवास ते कुठल्या ना कुठल्या वाहनाने करतात.

अमरकंटक येथील नर्मदा मैय्याच्या मंदिर परिसरात तर अजब प्रकार घडला. नर्मदा मैय्याचे मंदिर मी फिरून बघत होतो. फोटो काढत होतो. फारच सुंदर व देखण्या बांधणीचे मंदिर आहे. थांबून सहजपणे बाजूला बघितले तर दोन व्यक्ती मराठीतून संभाषण करीत होत्या. कुतुहलाने विचारले तर ते नागपूरहून आले होते व बसने नर्मदा परिक्रमा करीत होते. त्यांनी मला विचारले, 'आपण कुठून आला आहात?' मी म्हणालो, 'डोंबिवलीहून' त्यावर ते म्हणाले, 'कितीजण नर्मदा परिक्रमा करीत आहात?','आम्ही दोघेच' मी उतरलो. 'दुसरं कोण आहे?' पुढचा प्रश्न, मी म्हणालो,'माझी पत्नी माझ्या बरोबर आहे.' कुठे आहेत

त्या?' पुढचा त्यांचा प्रश्न. मी माझ्या पत्नीला हाक मारून जवळ बोलाविले. आम्हा दोघांना पाहून त्या दोघांनी बसमधून परिक्रमा करणाऱ्या सर्वांना हाका मारून जवळ बोलाविले. आम्ही दोघे पती-पत्नी पायी नर्मदा परिक्रमा करीत आहोत हे पाहून त्या सर्वांना आश्चर्यमिश्रित आनंद वाटला. पुढच्याच क्षणाला ५० आणि १०० रुपयांच्या नोटांचा आमच्यावर वर्षाव झाला. खाऊच्या पुड्या, बिस्किटाचे पुडे, शिध्याच्या पुड्यांचाही वर्षाव झाला. एव्हढेच नव्हे तर एका महिलेने आपल्या पिशवीतून नवीन कोरी शाल आम्हा दोघांच्याही खांद्यावर पांघरून एक अलौकिक असा सत्कार केला. या सत्काराने आम्ही एवढे भांबावून गेलो की आमच्या तोंडून शब्द फुटेनात. स्थानिक रहिवासी अशा प्रकारे पैसे, वस्तू, शिधा, बिस्किटाचे पुडे, खाऊच्या पुड्या देताना अनुभवले होते, परंतु महाराष्ट्रातले लोक महाराष्ट्राबाहेर महाराष्ट्रातल्याच एका दांपत्याचा सत्कार अनुभवताना, दीड दोन हजार किलोमीटर लांब राहणाऱ्या आम्हा दोघांवर, नर्मदा मैय्याने अशाप्रकारे आनंदाचा वर्षाव करावा हे अकल्पित होते.

असाच एकदा संध्याकाळी नर्मदा मैय्याच्या काठाशी असलेल्या देवळात पोहचलो. पुढचे गाव खूप दूर होते. म्हणून मुक्काम येथेच करावा असे ठरविले. रात्रीच्या मुक्कामासाठी देवळाच्या पुजाऱ्याने शेजारील धर्मशाळेची एक खोली दिली. पुजाऱ्याकडे रात्रीच्या भोजनाविषयी विचारणा केली. त्याने सदावर्त देतो जेवण तुम्हीच बनवा असे सांगितले. त्यावर आम्ही सांगितले, 'हमे चुल्हा जलाने नही आता. बनाया भोजन मिल सकता है क्या?' त्यावर पुजारी जरा रागातच म्हणाला,'चुल्हा जलाने नही आता तो परिक्रमा क्यू कर रहे हो? परिक्रमा छोडकर घर जाओ.' त्यावर वस्तुस्थितिचा अंदाज घेऊन काहीच प्रतिक्रिया दर्शविली नाही. पुजाऱ्याला 'नर्मदे हर' म्हणून आजुबाजुच्या दुकानांतून तयार भोजनाची चौकशी केली. काहीच प्रतिसाद मिळाला नाही. सदावर्त द्यायला सर्व जण तयार होते. शेवटी रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका इसमाला विचारले, त्यावर तो म्हणाला, 'मी तयार भोजन देईन पण माझ्या हातचे बनविलेले जेवण तुम्हांला चालेल का?' आम्ही त्याला विचारले,'असे तू का म्हणतो आहेस?' त्यावर तो म्हणाला,'मी जातीने भंगी आहे.' त्यावर आम्ही त्याला म्हणालो,'आम्ही शहरात रहातो. शहरातून आम्ही मोठमोठ्या हॉटेल मध्ये आवडीने जेवतो. जेवण कोणी बनविले याचा विचार आम्ही कधीच करत नाही. तू तुझी जात स्वच्छ मनाने सांगितली आहेस, म्हणजेच तुझ्या मनात काहीच पाप नाही. आता तुझ्या हातचेच जेवण आम्ही जेवणार. फक्त जेवण थोडेसेच बनव जास्त जेवण बनविलेस तर आम्ही टाकून देणार नाही, पण ते तुलाच खावे लागेल.' एवढे म्हणून आम्ही धर्मशाळेत परतलो व स्नान वगैरे करून नर्मदा मैय्येच्या पूजेच्या तयारीला लागलो. एवढ्यात एक दुकानदार त्या इसमाला घेऊन आला व आम्हांला विचारू लागला की, तुम्ही याला जेवण बनवायला सांगितले आहे का? माझ्याकडे हा सदावर्ताचे साहित्य मागतो आहे. त्यावर आम्ही म्हणालो हो त्याने जेवण बनवून द्यायचे मान्य केले आहे. ठीक आहे. हा इसम तुम्हांला जेवण बनवून देईल. थोड्या वेळाने तो आमच्यासाठी जेवण बनवून घेऊन आला. त्याच सुमारास देवळातल्या पुजाऱ्याला काय वाटले कोणास ठाऊक. त्यानेही थोडीशी खिचडी बनवून आम्हाला आणून दिली. आम्ही त्याचाही स्वीकार केला. त्या इसमाने आम्हांला शब्द दिल्याप्रमाणे जेवण आणून दिले होते ते थोडेसे जास्तच झाले. बॅटरीच्या उजेडात आम्ही त्याचे घर शोधून जास्तीचे जेवण त्याला दिले, त्यावेळी तो खूपच आनंदात दिसला. कदाचित कुठलाही परिक्रमावासि त्याच्या हातचे जेवण जेवला नसावा. 'सकाळचा चहा घेऊनच येथून तुम्ही पुढे जा, रस्ता हाच आहे' असे तो आग्रहपूर्वक म्हणाला, आम्हीही ते मान्य

---

जगणे साधे असते. प्रेम करणे साधे असते. हसणे साधे असते.जिंकणे साधे असते.
मग अवघड काय? साधे असणे, अवघड असते.

केले. सकाळी उठून आवरून निघालो व त्याच्याकडे चहासाठी थांबलो. त्याचे घर आणि एकूण परिस्थिती पाहिली. त्यावेळी आम्हांला उत्सुकता होतीच की रात्रीच्या जेवणाचे याने काय केले? विचारल्यावर तो म्हणाला, 'वो भोजन रातको मेरी माँ ने पालिया.' आमच्या अंगावर अक्षरशः शहारे आले. म्हणजे बाकीचे कुटुंबातील सर्वजण रात्री उपाशीच झोपले होते. नर्मदा मैय्याने समाजाचे असेही एक रुप व त्यांची मानसिकता दाखविली. स्वतःचे कुटुंब उपाशी राहिले तरी चालेल, नर्मदा परिक्रमावासी उपाशी रहाता कामा नये, केवढी ही उदारता. धन्य ती नर्मदा मैय्या आणि नर्मदा मैय्याकाठचे रहिवासी.

या नर्मदा परिक्रमेचे वैशिष्ट्य म्हणजे मनात आलेली इच्छा पूर्ण होते. आपल्या बागेतील केळी, पपई, चिक्कू, पेरु, मटारीच्या शेंगा,भुईमूगाच्या शेंगा अशा खाण्याच्या वस्तू रस्त्यावरून जाणाऱ्या नर्मदा परिक्रमावासियांना थांबवून देण्यात इथले रहिवासी धन्यता मानतात. हीच नर्मदा मैय्याची सेवा हा भाव पदोपदी आपल्याला दिसतो. एके दिवशी सकाळी एका गावातून दुसऱ्या गावात जात असताना एक इसम झोकांड्या खात आमच्याकडे येताना दिसला. त्याला विचारले की या गावात चहाची टपरी किंवा हॉटेल आहे का? आमची चहाची व्यवस्था कुठे होईल? तो म्हणाला या माझ्यामागून व एका घराशी थांबून त्याने आम्हांला चहा देण्यासाठी जरा वरच्या आवाजात आज्ञा केली. घरातली माऊली बाहेर आली व आम्हांला म्हणाली, 'बसा चहा करते.' थोड्या वेळाने त्या इसमाला गावातले लोक काही काम करीत नाही म्हणून वाट्टेल ते बोलत होते. थोड्या वेळातच कळले की ज्या घरातून आम्हांला चहा मिळणार आहे ते घर त्याचे नाहीच. त्या घरातून मिळालेला चहा आम्ही घेतला, त्यानेही चहा घेतला. त्याला पुढचा रस्ता कुठला म्हणून विचारले तर तो म्हणाला, थांबा मीच तुम्हाला रस्ता दाखवतो. तुम्ही नर्मदा परिक्रमावासी आहात. तुम्हाला रस्ता दाखवला नाही तर नर्मदा मैय्या माझ्यावर रागवेल. असे म्हणून तो पुढे व आम्ही मागे असे चालत होतो. वाटेतील काटेकुटे मोठे दगड तो आपल्या हाताने बाजूला करत होता व पुन्हा पुन्हा म्हणत होता, 'नर्मदा परिक्रमावासी चल रहे है, रस्ता अच्छा होना जरूरी है' सुमारे १.५ ते २ किलोमिटर चालल्यावर थोडा चांगला व सरळ दुसऱ्या गावाकडे जाणारा रस्ता आला. त्यानंतर तो म्हणाला, 'आप इस रस्तेसे सीधे जाईयेगा, यही परिक्रमावासीयोंका मार्ग' आम्ही त्याला धन्यवाद दिले व रस्ता दाखविल्या बद्दल मोबदला म्हणून पैसे देऊ लागलो तर तो पैसे घ्यायला अजिबात तयार नाही! दुसऱ्याचे मोफतचे श्रम घेणे आमच्या मनाला पटत नव्हते. शेवटी न राहवून सॅकमधले दोन बिस्किटाचे पुडे देऊ केले, तेही तो घेईना. शेवटी हा नर्मदा मैय्याचा प्रसाद आहे, तुझ्या मुलांना खाऊ म्हणून तू याचा स्वीकार कर. या आमच्या विनंतीनंतर त्याने ते बिस्किटाचे पुडे घेतले. झोकांड्या जात असलेल्या अवस्थेतही त्याची नर्मदा परिक्रमावासीयां बद्दलची श्रद्धा पाहून आश्चर्य वाटले. सहज मनात आले हाच प्रसंग जर डोंबिवलीत घडला असता तर पैसे हातात पडल्याक्षणीच त्याचे पाय अधीरतेने एखाद्या बारकडे वळताना दिसले असते!

असाच एक विशेष प्रसंग अनुभवायला मिळाला. आज ११ जानेवारी, माझ्या पत्नीचा वाढदिवस. शुभेच्छांचे सतत फोन येत होतेच. पण घरी असतो तर काहीतरी गोडधोड करून वाढदिवस साजरा करता आला असता, पण परिक्रमेत गोड काय तर बिस्किटे किंवा चॉकलेटस्! सकाळी एका गावात चहा नाश्ता मिळाला. दुपारी जेवणासाठी ज्या गावातून जात होतो, त्या ठिकाणी चौकशी केली तर 'आपका भोजन प्रसादीका व्यवस्था उधर है' असे म्हणून टेकडीवरच्या देवळाकडे निर्देश करीत सांगितले. थोडे पुढे जाऊन तेच ऐकायला मिळाले. जेवणासाठी येवढ्या उंच टेकडीवरच्या देवळात जा व पुन्हा खाली उतरून पुढच्या मार्गाने जायचे या विचाराने आम्ही

ते टाळत होतो. पण एक तरुण मोटारसायकलने अगदी आमच्या समोरच येऊन विनवण्या करू लागला. मनात विचार आला हे टाळून पुढे गेलो तर दिवसभर काहीच मिळणार नाही. कदाचित उपाशी रहावे लागेल. नर्मदा मैय्याच परीक्षा घेत आहे. जाऊ या आपण या देवळात जेवण घेऊ मग पुढे होऊ. असा विचार करून टेकडीवरच्या देवळात जेवायला म्हणून गेलो, बघतो तर काय, मांडव वगैरे घालून अगदी लग्नातल्या जेवणाची तयारी! नर्मदा मैय्याने असाही एक आश्चर्याचा धक्का दिला. सहज म्हणून चौकशी केली काय कोणाचे लग्न वगैरे आहे की, सगाई वगैरे आहे की काही सण वगैरे आहे का? तर नाही आज अमावस्या आहे व गावातले सर्वजण अमावस्येच्या दिवशी नर्मदेत स्नान वगैरे करून गावातल्या या देवळात एकत्र भोजन करतात. गावातल्या सर्व महिला एकत्र येऊन स्वतः जेवण वगैरे बनवून हा दिवस साजरा करतात. दर अमावस्येला येथे असेच घडते. या ठिकाणी लहानमोठा-उच्चनीच असा भेदभाव नाही. गरीब श्रीमंत शेजारी शेजारी बसून एकत्र जेवताना बघून आनंद वाटला. शहरातून सध्या काही हाऊसिंग सोसायट्यात वर्षातून एकदा एकत्र येऊन जेवण करण्याची प्रथा सुरू झालेली आहे. फरक एवढाच की शहरांतून कॉन्ट्रॅक्ट दिले जाते. नर्मदा किनारी गावातल्या महिला एकत्र येऊन सर्व काही करतात.

**बऱ्या वाईट गोष्टी**

नर्मदा परिक्रमेत समाजजीवनाचे अवलोकन करीत असताना काही चांगल्या व काही वाईट गोष्टी बघायला मिळाल्या. प्रथम काही चांगल्या गोष्टींचा विचार करू. काही आश्रमांतून व्यसनमुक्ती केंद्रे चालविली जात आहेत. तर हिरापूरच्या आश्रमात तरुणांना आपल्या स्वबळावर स्वतंत्रपणे उभे रहाण्याचे शिक्षण देण्यात येत आहे. सुतारकाम, लोहारकाम, बांधकामाचे ज्ञान, वेल्डींगचे ज्ञान, दगडातून मूर्ती कोरण्याचे काम करण्याची कला शिकविले जाते. लहान मुलांसाठी वेदपाठशाळा चालविली जाते व ती सर्वांसाठी खुली आहे. शाळेत शिकणाऱ्या मुलांसाठी शहरांतून काही व्यक्ती येथे येऊन रहातात व विद्यार्थ्यांकडून अभ्यास करून घेतात. हा आश्रम चालविणारे महंत आहेत अगदी दक्षिणेकडचे त्यांचे नाव आहे 'षणमुखानंद स्वामी'. या शिवाय परिक्रमा मार्गात स्त्रियांना रोजगार मिळावा त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून काम करणाऱ्या संस्थाही आढळल्या. गरीब होतकरू आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाबरोबरच सर्वांगीण विकासासाठी काम करणाऱ्या संस्थाही पाहिल्या. नाशिकच्या श्रीमती भारती ठाकूर यांचे लेपा पुनर्वास येथील कार्य तर अद्‌भुत आहेच, शिवाय या परिक्रमेत पुण्याचे श्री.सुधीर चितळे व सौ.प्रतिभा चितळे यांचेही कार्य पहाणे, त्यांच्याशी गप्पा मारायला मिळणे म्हणजे आनंदाची परिसीमाच. या निवेदनाच्या सुरुवातीलाच नर्मदा परिक्रमा जागतिक कीर्तिमान आहे असा उल्लेख आहे. आमच्या नर्मदा परिक्रमेच्या कालावधीतच एक फ्रान्सचे दांपत्य स्वेच्छेने मनोभावे ही नर्मदा परिक्रमा करीत होते असे समजले. सध्या इग्लंडमधल्या एक भगिनी (त्यांनी आता मीराबेन हे नाव स्वीकारले आहे) नर्मदा नदीवरील बर्गी धरणाच्या बाजूच्या बर्गी कॉलनीत टेकडीवर श्री नंदीकेश्वराच्या मंदिरात राहून समाजकार्य करीत आहेत. या भगिनी चार महिने इग्लंडमध्ये व आठ महिने श्रीनंदीकेश्वराच्या मंदिरात वास्तव्याला असतात. त्यांनी स्वतः तीन वर्षे तीन महिने तेरा दिवस अनवाणी परिक्रमा केली आहे. त्यांची भेट झाल्यामुळेही खूप आनंद झाला.

या समाज जीवनाची वाईट बाजू म्हणजे प्रचंड व्यसनाधीनता आहे. खरतर या परिसरातील आश्रमांमधून आम्हांला चहा जेवण व इतर सोई मिळाल्या. खाल्ल्या घरचे वासे मोजू नयेत, वाईट काही बोलू नये असे संस्कार व अलिखित नियम आहे, तरीही त्यांची क्षमा मागून व न

---

या जगाला आपली गरज आहे हे ज्या क्षणी आपल्याला समजेल, तो क्षण आपल्यासाठी खूप महत्त्वाचा असतो.

राहवून सांगावेसे वाटते की या आश्रमांपैकी ९० ते ९५ टक्के आश्रमातून गांजाचा सर्रास वापर व व्यापार चालतो. डोंगरांतून गांजांची शेती आहे. तरुण मंडळी या आश्रमांतून गांजासाठी येतात हे पाहून वाईट वाटले. सरकारमान्य देशी शराबकी दुकान, यहा भंग मिलेगी अशा पाट्या लावलेली दुकाने आढळली. एवढे असूनसुद्धा या ठिकाणी नर्मदा मैय्यावरची श्रद्धा अपार आणि अद्वितीय आहे. या नर्मदा परिक्रमेचे पावित्र्य राखण्यासाठी प्रत्येक परिक्रमावासियाने जेवताना 'ओम् सह नाववतू ..... व वदनी कवळ घेता ....' हे अवश्य म्हणावे. आपण जेवण करीत असताना जेवण वाढणाऱ्याच्या चेहऱ्यावरचे भाव बरेच काही सांगून जातात. आपल्याला कोणीही काहीही दिले अगदी चहा, जेवण, सदावर्त, वस्तूसुद्धा तरीही त्याच ठिकाणी कृतज्ञता म्हणून 'सर्वेपि सुखिन; संतु ....'व हा श्लोक पूर्ण म्हणावा. त्याना संस्कृत समजत नाही म्हणून हिंदीतून 'आपका घर परिवार सुखी रहे, समृद्ध रहे, आपकी खेतीबाडी, धंदा, नौकरी में बढोत्री होती रहे, आप सभी का स्वास्थ अच्छा रहे यही हमारी नर्मदा मैय्यासे प्रार्थना है. नर्मदेहर – नर्मदे हर – नर्मदे हर!' म्हणून त्यांचा निरोप घ्यावा. त्यांना याच आशीर्वादाची अंतर्मनात अपेक्षा आहे. पण त्यांना आशीर्वाद देणारे आपण कोण? आपण फक्त नर्मदामैय्याकडे प्रार्थना करून नक्कीच सांगू शकतो की तू या सर्वांची काळजी घे.

आम्ही जसा नर्मदा परक्रमेत विविध अंगानी विविधरूपात आनंद घेतला व या भूतलावर नर्मदा परिक्रमारूपी स्वर्गविहाराचा आनंद घेतला तसाच आनंद आपण सर्वांनी घ्यावा हीच मनापासून इच्छा. धन्यवाद!

नर्मदेहर.... नर्मदेहर.... नर्मदेहर....

**परिचय**

**श्री. अशोक वझे** (६५) व **सौ. मंगला अशोक वझे** (५८) या दांपत्याने नर्मदा परिक्रमा दिनांक २६ नोव्हेंबर २०१२ ते दिनांक २ एप्रिल २०१३ या १२८ दिवसांच्या (चार महिने आठ दिवस) कालावधीत पायी प्रवास करून पूर्ण केली. सह्याद्रीतील पदभ्रमण, हिमालयातील पदभ्रमण, विविध राज्यांतील पदभ्रमण व दररोज ८ ते १० किलोमीटर चालण्याच्या सरावामुळे ही नर्मदा परिक्रमा सलग २८०० किलोमीटरचा प्रवास करून पती-पत्नी जोडीने सहजपणे पूर्ण केली. महाराष्ट्रातून पायी नर्मदा परिक्रमा करणारे असंख्य असले तरी दांपत्याने एकाच वेळी पायी नर्मदा परिक्रमा करणारे फारच थोडे आहेत.

अधिक माहितीसाठी वाचकांनी ९८२०३५१८१२/९८१९२०१६५२ किंवा ०२५१-२४३१४६१ या क्रमांकावर संपर्क साधावा.

**सौ. मंगला अशोक वझे**
**श्री. अशोक माधव वझे**
अे/५ गुरुछाया सोसायटी,
गणेश मंदिर पथ, डोंबिवली (पूर्व)
जि. ठाणे, पिन – ४२१ २०१
फोन नं.(०२५१) २४३१४६१
मोबाईल : ९८१९२०१६५२,९८२०३५१८१२

●●●

***जानेवारी २०१४***

**अंकात नर्मदा परिक्रमावर**
**श्री. अरविंद ओक**
**यांनी लिहिलेले लेख**

श्रीमंत-गरीब असा भेदभाव न करता प्रत्येक माणसाचा आदर करा. कारण उद्या तुम्हीही त्या स्थितीत असू शकता.

# धर्म स्वातंत्र्य आणि अंधश्रद्धेविरुद्ध कायदा

*नागपूरच्या अधिवेशनात दि. १८/१२ रोजी कायदा पारित होण्यापूर्वीचा हा लेख आहे. - संपादक*

'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत'

भारत वर्षाच लाडकं दैवत असलेला श्रीकृष्ण स्वतः सांगतोय की जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानी येते तेव्हा तेव्हा मी वसुंधरेवर अवतार घेतो. महाभारताच्या काळामध्ये धर्माचा ऱ्हास रोखण्यासाठी श्रीकृष्णाला जन्म घ्यावा लागला. लहानपणापासूनच रामायण, महाभारत इ. महाकाव्ये आणि त्यांत अंतर्भूत असलेल्या नीतिकथा ऐकत आपण मोठे होतो. या व्यतिरिक्त 'बायबल' मधल्या येशूच्या कथाही आपण ऐकलेल्या असतात. धर्म-अधर्म, नीति-अनिती हे शब्द वारंवार कानावर पडतात. पण आपण कधी यांच्या अर्थाचा विचार केलाय का? धर्म म्हणजे काय, नीती म्हणजे काय याच्या संकल्पना तपासून बघितल्या आहेत का?

वेदकालीन वाङमयाचा संदर्भ द्यायचा तर आजच्या भाषेत धर्म म्हणजे 'List to do ' काय करावे, कसे आचरावे याची यादी. उपनिषदे किंवा पुराणे यांत चुकीच्या किंवा धर्मबाह्य आचरणाला काय शिक्षा मिळते याच्या कथा किंवा दाखले अध्याहृत आहेत. म्हणजेच आदिम संस्कृतीपासून धर्म आणि कायद्याचे अस्तित्व आहेच. कालानुरुप त्यात बदल घडत गेला. आजची परिस्थिती पाहता धर्म आणि कायदा यांच्या अस्तित्वालाचा आवाहन दिले गेले आहे.

आदिम काळापासून आर्य, अनार्य, वैश्य, शैव, द्राविड, नाग असे अनंत पंथ या भारतवर्षात सामावले गेले, बेमालूमपणे एकमेकांत मिसळले गेले. यांतच भर पडली ती परकीय आक्रमणांची. इतिहासाच्या दाखल्याप्रमाणे तसेच उपलब्ध संत वाङ्मयाच्या आधारावर असे ठोसपणे सांगता येते की साधारण सातव्या शतकापासून म्हणजे राजा शालिवाहनाच्या राज्याच्या अस्तानंतर 'धर्म' या संकल्पनेला कलाटणी मिळण्यास सुरुवात झाली. 'श्रद्धा' आणि 'भक्ती' या दोन महत्त्वाच्या पैलूंवर काजळी चढण्यास सुरुवात झाली. सामूहिक प्रार्थना, बलोपासना याचा चुकीचा अर्थ लावला जाऊ लागला आणि याचाच परिपाक म्हणजे, धर्म अधर्म झाला, भक्ती अभक्ती झाली तर श्रद्धेच रूपांतर अंधश्रद्धेत झालं.

आधी उद्धृत केल्याप्रमाणे सांस्कृतिक सरमिसळीमुळे अनेक देवता निर्माण झाल्या. प्रत्येक पंथाने शर्यतीत टिकाव धरण्यासाठी किंवा आपले वर्चस्व अबाधित राखण्यासाठी धर्माला अनुसरून नियमावली तयार केली. यातूनच मूळ धर्म मागे पडला आणि नियमांना महत्त्व प्राप्त झाले. या नियमांमध्ये कालानुरुप वाढ झाली. किचकटपणा आला आणि काटेकोरपणादेखील आला. शतकानुशतके आंधळेपणाने या नियमांचे पालन होत राहिले आहे. यालाच आपण रुढी-परंपरा असे गोंडस नाव दिले आहे. यातूनच 'अंधश्रद्धे'चा जन्म झाला.

२१ व्या शतकात जिथे भारताकडे 'भविष्यातील महासत्ता' म्हणून पाहिले जाते, तेथे या रुढी - परंपरांचा किती पगडा आहे हे तपासून पाहण्याची वेळ आता आली आहे. 'अनंत आमुची ध्येयासक्ती अन् अनंत आमुच्या आशा' या चालीवर म्हणावेसे वाटते की 'अनंत आमुच्या जाती-पाती अन् अनंत आमुच्या अंधश्रद्धा'.

स्वातंत्र्यपूर्व काळात जेव्हा हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यांतून सारे क्रांतीवीर स्वातंत्र्य मिळावं यासाठी

जगात चांगल्या गोष्टी फक्त इतरांच्याच संदर्भात घडतात, असे आपल्याला वाटते तेव्हा,
आपणही इतरांसाठी 'इतर' असतो, हे आपण विसरतो.

झगडत होते. आपल्या प्राणांची आहुती देत होते. त्याचवेळी हिंदुस्थानातील काही मोजकी मंडळी समाज सुधारणेच्या कामी जुंपली होती. रूढी-परंपरांच्या, नीती- अनितीच्या, श्रद्धा-अंधश्रद्धेच्या विळख्यात गुरफटलेल्या समाजाला त्या जोखडातून बाहेर काढून, वर्तमानाचे भान देत, या समाज सुधारकांनी आपल्या श्रद्धा आता काळाच्या दगडावर घासूनपुसून पाहण्याची वेळ आली आहे. हे प्रतिपादित केले. त्यासाठी त्यांनी हिंदुस्थनावर राज्य करणाऱ्या ब्रिटिशांचा आधार घेतला आणि कायदे तयार केले. तसेच आपापल्या अखत्यारित येणाऱ्या प्रदेशांत किंवा संस्थानांमध्ये हे कायदे काटेकोरपणे पाळले जातील याची दक्षत घेतली. बालविवाह रोखण्याचा कायदा, सतीबंदी, विधवा विवाह कायदा असे अनेक कायदे करून लाचारीने जगणाऱ्या अनेक महिलांना, स्त्रियांना उजळ माथ्याने जगण्याचा हक्क प्रदान केला. स्त्री-शिक्षण कायद्यामुळे माजघरातील स्त्रियांना मोकळे आभाळ बघायला मिळाले. यामुळे समाज सुधारक-न्यायमूर्ती गोविंद महादेव रानडे, त्यांच्या पत्नी रमाबाई रानडे, महात्मा जोतीबा फुले, त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले, आगरकर दांपत्य, राजा राममोहन रॉय, टिळक, गोखले या सर्व समाज सुधारकांना अनेक आशीर्वाद तर मिळालेच, पण महत्वाचे म्हणजे उपरोक्त कायद्यांच्या कठोर अंमलबजावणीमुळे भारताच्या पिढ्या मिळणारे स्वातंत्र्य सांभाळायला सक्षम ठरतील याची आशा निर्माण झाली. स्वराज्याची संकल्पना मांडणाऱ्या शिवाजी महाराजांपासून ते स्वातंत्र्यवीर सावरकरांपर्यंत इतकेच नव्हे तर प्रतिसरकार स्थापन करणाऱ्या नेताजी सुभाषचंद्र बोसांपर्यंत साऱ्यांनी धर्माला कायद्याच्या चौकटीत बांधण्याची शिकस्त केली.

याचाच परिपाक म्हणजे अनेक चुकीच्या प्रथांना आळा बसला. जसजसा शिक्षणाचा प्रसार तळागाळातील जमातींपर्यंत होत गेला तसतसा अंधश्रद्धेतील रूढी-परंपरांमधील फोलपणा समाजाच्या लक्षात येत गेला. परंतु हे १०० टक्के खरे नव्हे. अजूनही समाजाचा मोठा भाग अंधश्रद्धेचे जोखड अभिमानाने अभिमानाने मिरवीत होता. साने गुरुजी, ग. प्र. प्रधान इत्यादींच्या प्रयत्नांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना झाली आणि प्रयत्नांना उचित दिशा मिळाली. विचार प्रर्वतन करणारे कार्यक्रम सूत्रबद्ध पद्धतीने आखले गेले तसेच राबवलेही गेले. परंतु अत्यंत धीम्या गतीने प्रयत्नांना यश मिळत होते. डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या रूपाने लोकांना विचार करायला भाग पाडणारा एक खंदा नेता लाभला होता. 'होता' म्हणताना यातना होत आहेत कारण अजूनही अंधश्रद्धेचा पगडा पूर्णपणे उतरलेला नाही हेच त्यांच्या हत्येमधून सिद्ध होते. अंधश्रद्धा आणि त्याचे व्यापारीकरण हा निबंधाचा वेगळा विषय होऊ शकतो. सातत्याने १८ वर्ष अंधश्रद्धा निर्मूलन कायदा होण्यासंबंधी पाठपुरावा करूनही जे साध्य झाले नाही, ते दुर्दैवाने डॉक्टरांच्या हत्येमुळे साध्य झाले आहे. परंतु यासाठी देखील एक 'नरबळी' द्यावा लागला नपक्षी सरकारनेच कायदा करण्यात चालढकल करून हा 'नरबळी' घेतला. एवढे होऊन कायदा संमत करण्यापेक्षा सरकारने केवळ 'अंधश्रद्धा निर्मूलनाचा' केवळ वटहुकूम जारी केला.

नरबळी, पशुहिंसा, गंडेदोरे बाबा-बुवा, तांत्रिक-मांत्रिक, जाखीण-डाकीण आणि या साऱ्यांचेअघोरी उपाय हे केवळ अशिक्षितांनाच नाही तर सुशिक्षित म्हणवणाऱ्यांना देखील जखडून ठेवतात हे वर्तमानपत्रांतील कित्येक बातम्यांमधून निदर्शनास येते.

शेवटी कायदा पारित होण्याची वाट बघण्याशिवाय आपल्या हातात काही उरत नाही आणि या उद्विग्नतेमधून वकिल होऊन काहीतरी करता येईल या आशेने शिकावेसे वाटते.

श्रीकृष्णाला प्रार्थना-'आता धर्माला ग्लानी आलीच आहे, तेव्हा लवकर अवतार घे.'

**- श्रीमती अबोली देवधर**
प्रथम वर्ष,विधि महाविद्यालय,
ठाणे

●●●

जेथे सुखाने राहू शकता येते, तेच स्थान उत्तम असते.

# श्रीमत् भगवद् गीता - अध्याय अकरावा
## विषय : विश्वरुप योग

*कै. शंकरराव मठांनी दिशासाठी दिलेल्या लेखमालेतील हा ११ व्या अध्यायावरील लेख. या लेखाच्या माध्यमातून कै. मठांना आम्ही विनम्र अभिवादन करतो. - संपादक*

**श्लोक १ ते ४-विश्वरूप दर्शनासाठी अर्जुनाची प्रार्थना**

अर्जुन म्हणाला-कृष्णा, तू माझ्यावर कृपा करण्यासाठी अध्यात्मातील परम रहस्य सांगितलेस. त्याने माझ्याकडून विस्तारपूर्वक गोष्टी ऐकिल्या तसेच तुझे अविनाशी महात्म्यही श्रवण केले. हे परमेश्वरा, हे असे तू तुझ्याविषयी सांगितलेस म्हणून हे पुरुषोत्तमा तसेच ते तुझे ईश्वरीय रुप पाहण्याची मला इच्छा आहे. हे योगेश्वरा त्याचे दर्शन दाखविणे माझ्यासाठी शक्य आहे असे तुला जर वाटत असेल तर मला तुझे जे अविनाशी रुप दाखव.

**श्लोक ५ ते ८-श्रीकृष्ण विश्वरुपाचे वर्णन करतो.**

श्रीकृष्ण म्हणतो- हे पार्था, माझी अनेक प्रकारची, अनेक रंगानी, आकृतींनी युक्त असलेली शेकडो किंबहुना हजारो दिव्य रूपे पहा. हे भारता- हे आदित्य, वसु, रुद्र, अश्विनी आणि मरुत् पहा, पूर्वी कधीही न पाहिलेली अशी अनेक आश्चर्ये येथे पहा. हे गुडाकेशा संपूर्ण स्थावर जंगम जगत् आणि जे काही पाहण्याची तुला इच्छा झाली असेल ते सर्व या ठिकाणी माझ्या देहात एकाच ठिकाणी विद्यमान असल्याप्रमाणे आत्ताच पहा. या आपल्या चर्मचक्षूने तू मला पाहू शकणार नाहीस म्हणून तुला मी दिव्य दृष्टी देतो. तिने तू माझे ईश्वरीय योग सामर्थ्य पहा.

**श्लोक ९ ते १४-संजय धृतराष्ट्राला विश्वरूपाचे वर्णन कथन करतो.**

संजय म्हणाला - हे राजा धृतराष्ट्रा, महायोगेश्वर कृष्णाने अर्जुनाला आपले परमश्रेष्ठ ईश्वरीय रूप दाखविले. त्या विश्वरूपाला अनेक मोठे, डोळे आहेत, त्यात अनेक अद्‌भुत देखावे आहेत. त्यावर अनेक प्रकारचे दिव्य अलंकार आहेत. त्याच्यापाशी अनेक आयुष्ये आहेत. त्याच्यावर अनेक दिव्य पुष्पमाळा असून उत्तम वस्त्रे होती व दिव्य गंध लावले होते. असा तो आश्चर्यांनी युक्त अनंत आहे. जर आकाशात एक हजार सूर्याची प्रभा एकदम प्रगट होईल तर ती त्या महात्म्याच्या कांतीसारखी कदाचित दिसून येईल. त्यावेळी अनेक प्रकारे विभागलेले सर्व जगत् अर्जुनाने त्या देवाधिदेवांच्या शरीरात एकत्र झाल्याचे पाहिले. त्या योगे आश्चर्याने थक्क होऊन अर्जुनाच्या अंगावर रोमांच उभे राहिले आणि तो मस्तक नम्र करून नमस्कार करता झाला व हात जोडून श्रीकृष्णाला म्हणाला.

**श्लोक १५ ते ३१-अर्जुन विश्वरूप पाहून स्तुती करतो**

हे देवा मी तुझ्या देहात सर्व देवांना, नाना प्रकारच्या प्राणि समूहांना, तसेच कमलासनावर बसलेला सर्वांचा स्वामी जो ब्रह्मदेव त्याला, सर्व ऋषींना आणि दिव्य सर्वांना पहात आहे. मी तुला अनेक बाहू, अनेक उदरे अनेक तोंडे, अनेक डोळे, अनेक रुपे असलेला चोहोंकडे पाहात आहे. हे विश्वरुपी विश्वेश्वरा तुझा अंत मध्य आदिही मला दिसून येत नाही. मुकुट, गदा, चक्र, धारण करणारे, तेजःपुंज दिसणारे, चोहोकडे प्रभा फाकलेले प्रदीप्त अग्नि सूर्याप्रमाणे तेजस्वी, अपरिचित आणि अगदी दिसावयास कठीण असे. तुझे रूप चोहोकडे मी पहात आहे. तुलाच ज्ञेय, परम अविनाशी, या विश्वाचा अंतिम आधार, शाश्वत धर्माचा अविनाशी संरक्षक आणि सनातन पुरुष असे मी मानतो. ज्याचा आदिमध्यान्त नाही, ज्याचे सामर्थ्य अनंत आहे, ज्याचे बाहू अनंत आहेत, चंद्र सूर्य ज्याचे डोळे

आहेत, प्रदीप्त अग्नी हे ज्याचे मुख आहे, आपल्या तेजाने या विश्वाला सामविणाऱ्या अशा तुला मी पहात आहे. हे महात्मन् तू एकट्यानेच आकाश आणि पृथ्वी यांमधील अंतर व्यापून टाकले आहे. त्याचप्रमाणे सर्व दिशाही तू घेरल्या आहेस. हे तुझं सारे रूप पाहून तिन्ही लोक फार व्यथित झाले आहेत. हे देवतांचे समूह तुझ्यात प्रवेश करीत आहेत. काही काही भीतीने हात जोडून प्रार्थना करीत आहेत. सिद्ध महार्षींचा समूह 'स्वस्ति स्वस्ति' असे म्हणून अनेक प्रकारच्या स्तोत्रांनी तुझे स्तवन करीत आहेत. रुद्र, आदित्य, वसु, साध्यगत, विश्वदेव होत. अश्विनी कुमार, असुर आणि सिद्धांचे संघ हे सर्व विस्मित होऊन तुझ्याकडे पाहात आहेत. हे महाबाहो, अनेक तोंडाचे, अनेक डोळ्यांचे, अनेक बाहूंचे, अनेक मोठ्यांचे, अनेक उदरांचे व अनेक दालामुळे विक्राळ दिसणारे तुझे हे अवाढव्य रुप पाहून सर्व लोक फार व्याकुळ झाले आहेत आणि मीही भयभीत झालो आहे.

हे व्यापक देवा आकाशाला जाऊन भिडलेले, प्रकाशमान, अनेक रंगांचे, जबडा पसरलेले, प्रदीप्त, विशाल नेत्रांनी युक्त अशा तुला पाहून माझा अंतरात्मा घाबरला असल्याने मी धैर्य आणि शांतिधारण करू शकत नाही. हे देवाधिदेवा हे जगन्निवासा, प्रलय काळाच्या अग्नीप्रमाणे विक्राळ दाढांनीयुक्त अशी तुझी ही तोंडे पाहून मला दिशाही कळत नाहीत आणि मला समाधानही होत नाही. यासाठी मजवर प्रसन्न हो. हे धृतराष्ट्राचे सर्व पुत्र राजसंघासह भीष्म, द्रोण, सूत पुत्र आमच्या बाजूच्या मुख्य मुख्य योद्ध्यासह तुझ्या तोंडात घुसत आहेत. काही तर दातात अडकले आहेत. त्यांच्या उत्तम अंगाचा चुराडा झालेला दिसून येत आहे. नद्यांचे मोठ मोठे जल प्रवाह ज्याप्रमाणे समुद्राकडेच धाव घेतात. त्याचप्रमाणे मनुष्य लोकातील हे वीर तुझ्या प्रज्वालित तोंडात प्रवेश करीत आहेत. पतंग आपल्या नाशासाठी मोठ्या वेगाने पेटलेल्या अग्नीत उड्या टाकतात.तद्वतच हे सर्व लोक अत्यंत वेगाने मरण्यासाठीच तुझ्या जबड्यात घुसत आहेत. हे व्यापक देवा चोहोकडून प्रज्वलित मुखांनी सर्व लोकांना गिळून तू जीभ चाटीत आहेत. तुझ्या उग्र प्रभा आपल्या तेजाने सर्व जगाला व्यापून चोहोकडे तळपत आहेत. हे देवाधिदेवा तुला नमस्कार करतो. तुम्ही प्रसन्न व्हा. उग्रस्वरूप धारण करणारा तू कोण आहेस? हे मला सांग. तू आदिपुरूष कोण हे जाणण्याची मला इच्दा आहे. तुझी ही प्रवृत्ति मला बिलकुल समजत नाही.

**श्लोक ३२ ते ३४ श्रीकृष्ण आपला प्रभाव सांगतो आणि युद्धासाठी अर्जुनाला प्रेरित करतो.**

श्रीकृष्ण म्हणतो - मी लोकांचा नाश करणारा वृद्धिंगत झालेला काळ आहे. येथे लोकांचा संहार करण्यास प्रवृत्त झालो आहे. तू युद्ध करणार नसलास तरी उभयतांच्या सैन्यात उभे असलेले हे सर्व वीर वाचणार नाहीत. म्हणून हे अर्जुना तू ऊठ, यश मिळव आणि शत्रूना जिंकून समृद्ध राज्याचा उपभोग घे. मी यांना पूर्वीच मारले आहे. म्हणून तू फक्त निमित्ताला पुढे हो. द्रोण, भीष्म, जयद्रभ, कर्ण व तसेच दुसरेही वीर मी पूर्वीच मारलेले आहेत. त्यांना तू मार, घाबरू नकोस. युद्ध कर. लढाईत शत्रूना तू जिंकशील.

**श्लोक ३५ ते ४६ भयभीत अर्जुन श्रीकृष्णची स्तुती करतो व चतुर्भुज होण्याबद्दल विनवितो.**

संजय म्हणतो - भगवंताचे हे वाक्य ऐकून कंपित झालेला अर्जुन हात जोडून श्रीकृष्णाला नमस्कार करीत भीतीने नम्र होऊन वारंवार सगद्‌गदित कंठाने असे म्हणू लागला.

अर्जुन म्हणाला - हे ऋषिकेशा हे योग्यच आहे, तुझ्या गुणकीर्तीने जग प्रसन्न होते आणि त्यांची प्रीती बसते. राक्षस तुला भिऊन दाही दिशास पळून जातात, सर्व सिद्ध पुरुषांचे संघ तुला नमस्कार करतात. हे महत्मन्- हे देवाधिदेवा, ब्रह्मदेवाचे साही श्रेष्ठ अशा तुझ्या आदिकारणासमोर ते का बरे नम्र होणार नाहीत? हे

काळ एखाद्या नदीसारखा असतो. त्यातल्या कोणत्याही क्षणाला तुम्ही पुन्हा स्पर्श करू शकत नाही.

जगन्निवासा, जे सत् आणि असत् आहे आणि त्या दोहोंच्या पलीकडे जो अक्षर आहे ते ही तूच आहेस. तू आदिदेव, पुराण पुरुष, जगाचा परम आधार, ज्ञाता, ज्ञेय व श्रेष्ठ स्थान आहेस. हे अनंत रूपा – तू हे जग विस्तारले आणि व्यापिले आहेस. तूच वायु, यम, अग्नि, वरुण, चंद्र, प्रजापति सर्वांचा आजोबा व पणजोबा आहेस. तुला हजारदा नमस्कार करतो तुला वारंवार नमस्कार करतो. हे सर्वात्मका तुला पुढून, पाठीमागून आणि सर्वच बाजूनी नमस्कार करतो. हे अनंत वीर्य – तुझा पराक्रम अतुलनीय आहे. तू सर्वांना चांगल्याप्रकारे प्राप्त होत असल्याने तूच सर्व काही आहेस. तुझा हा महिमा न ओळखल्यामुळे मी मित्र समजून हे कृष्णा, हे यादवा, हे सख्या असे जे चुकीने वा प्रेमाने म्हटले असेल हे अत्युच्च आहार विहारात, निजण्या बसण्यात, हास्य, विनोदाच्यावेळी एकत्व असता वा अनेकांच्या समोर मी जो काही तुझा अपमान केला असेल त्या अपराधासाठी हे अनंत स्वरूपा तुझी क्षमा मागतो. हे अतुल प्रभावा, तू या स्थिरचर जगताचे पिता असून सर्वांना पूज्य आणि गुरुंचाही श्रेष्ठ गुरु आहेस. त्रैलोक्या तुझ्या बरोबरीचा कोणी नाही. मग तुझ्याहून श्रेष्ठ कोठून असणार! हे दवा यासाठी नम्रतेने नमस्कार करून मी तुझी, ईश्वराची प्रार्थना करीत आहे. तू पुत्राचे पिता, मित्राचे मित्र, सख्याचे सखा मानून क्षमा कर. सर्व अपराधाची क्षमा करण्यास तू योग्य आहेस. हे देवाधिदेवा, हे जगन्निवासा तुझे पूर्वी कधी न पाहिलेले हे विश्वरुप पाहून मी पुलकित झालो आहे आणि तसेच व्याकुळही आहे. म्हणून देवा प्रसन्न हो आणि ते पाहिलेच रुप दाखव. हे सहस्त्र बाहो आणि हे विश्वमूर्ते मी तुला पुर्वीप्रमाणेच गदा आणि हातात चक्र घेतलेला असे पाहू इच्छितो. त्याच चतुर्भुज रुपाने प्रगट हो.

**श्लोक ४७ ते ५० विश्वरूप महिम्याचे श्रीकृष्णाकडून वर्णन नंतर पूर्वीचे रूप धारण करतो.**

श्रीकृष्ण म्हणतो – हे अर्जुना तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणीही पूर्वी न पाहिलेले हे माझे तेजोमय विश्वस्वरूपी, अनंत, आद्य असे श्रेष्ठ रूप प्रसन्न होऊन मी आत्मयोगाच्याद्वारा तुला दाखविले आहे. हे कुरुश्रेष्ठा मला या प्रकारच्या रूपात या मनुष्यलोकी वेदाध्ययनामी, यज्ञाने, दानाने, कर्मांने अथवा उग्रवदाने तुझ्या शिवाय दुसरा कोणीही पाहू शक नाही. माझे हे घोर रूप पाहनू तुला व्यथा होऊ देऊ नकोस. भीती सोडून संतुष्ट मनाने पुनः माझे ते पहिलेच रूप पहा.

संजय म्हणतो – महात्म्या वासुदेवाने असे अर्जुनाला सांगून पुनः आपले पूर्वीचे स्वरूप दाखविले. म्हणजे सौम्य शरीरयुक्त होऊन घाबरलेल्या अर्जुनाला धीर दिला.

**श्लोक ५० ते ५५ अनन्य भक्तीशिवाय चतुर्भुज रूपाचे दर्शन होत नाही–अनन्यभक्तीचे फळ होय.**

अर्जुन म्हणाला – जनार्दना तुझे सौम्य मानवी रूप पाहून मी आता सावध होऊन आपल्या जाणिवेवर आलो आहे. श्रीकृष्ण म्हणतो – पहावयास अत्यंत कठीण असे जे रूप तू पाहिलेस ते रुप पहाण्याची देवसुद्धा नित्य इच्छा करतात. तू जसे मला पाहिलेस तसं वेदांनी, तपाने, दानाने अथवा यज्ञानेही मला कोणी पाहू शकत नाही. हे अर्जुना मला अशा प्रकारे जाणणे, पहाणे आणि माझ्या ठायी प्रवेश करणे, केवळ अनन्य भक्तीनेच शक्य आहे. अर्जुना, जो माझ्यासाठी कर्म करतो, जो मला परमश्रेष्ठ असे समजतो, जो भोगापासून अलिप्त असतो आणि सर्व तू माझ्यावर प्रेम करतो, तो माझा भक्त मला प्राप्त होतो.

या अध्यायात परमात्म्याच्या विश्वरूपाचे दिक्‌दर्शन केले आहे. विभूतीबद्दल कोणतीही शंका निर्माण होऊ नये, संपूर्ण विश्वच परमेश्वराचे रूप आहे. असे या अध्यायात सांगितले आहे. विभूती म्हणजेच केवळ परमात्म स्वरूप नसून सर्व रूपात एकच आत्मा विराजमान असल्याने वस्तुतः काही भिन्नता नाही. ही सर्व रूपे मिळून एकच अखंडरूप ईश्वर आहे आणि त्याला याचप्रमाणे

ज्याचे वागणे बाहेर एक व आत दुसरे असे दुटप्पी असते त्याला मित्र कमीच असतात.

अखंड एकरस पाहिले पाहिजे. विश्वरूपाचे ज्ञान हेच वैदिक धर्माचे मुख ज्ञान आहे. एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति। या ज्ञानाचे महत्त्व या धर्मकल्पनेत आहे. वास्तविक पाहता सर्वच अध्ययांतून शांततेच्या व्यापक कल्पनेसंबधी अनेक पद्धतीने विचार मांडले आहेत. आत्मा-सर्वगत (२.२४) ब्रह्म सर्वगत (३.३५) समोऽहंसर्वभूतेषु।(९.२८) वासुदेवः सर्व।(७.१९) पुरुष एव इदं सर्वं यत्भूतं यत्च भण्यं। पु.सू.२ विश्वतःचक्षुः उत विश्वतो मुखः विश्वतो बाहुः उत विश्वतः पात्। सं बाहुभ्यांधमति संपतत्रैः द्यावा भूमी जवयन् देव एकः। (ऋ.१७.८१.३) परमेश्वराला सगळीकडे डोळे आहेत, सगळीकडे तोंडे आहेत, सगळीकडे बाहू आहेत, सगळीकडे पाय आहेत, तो आपल्या अनंत बाहूंनी आणि अनंत पायांनी सर्वांना प्रेरणा देणारा एकच देव आहे. उपनिषदातूनही हीच कल्पना आढळते. एतस्माम् जायते प्राणः मनः सर्वेन्द्रिकाणिच। रवं वायुः ज्यांतिः आपः पृथिनी विश्वस्य धारिणी। याच्यापासूनच प्राण, मन, सर्व इंद्रियं, आकाश, वायु, ज्योति, पाणी, पृथ्वि ही सर्व उत्पन्न होतात. (मुंडक उप.) यतो वा इमावि भूतानि जायन्ते। येन जातानि जविन्ति। यत् प्रयन्ति अभिसंविशन्ति। तत् विजिज्ञासस्व। तत् ब्रह्मइति तै. उप.३/११. ज्याच्यापासून ही सर्व भूते उत्पन्न होतात, ज्याच्यामुळे ही जिवंत राहतात आणि ज्याच्यात ही शेवटी मिळतात ते ब्रह्म होय. एषो ह देवः प्रविशोनु सर्वाः पूर्वो ह जातः सउ गर्भे अन्तः। स एव जातः स ज निष्यमाणः प्रत्यङ् जनाः तिष्ठति। सर्वतो मुखः।श्वेताश्वतर उप हा देव सर्व दिशा उपदिशात आहे. तो पूर्वी जन्मला आहे आणि तो पुनः गर्भात आला आहे. तोच पूर्वी झाला होता आणि पुढेही होईल. तो प्रत्येक मनुष्यात राहतो. त्याचे तोंड सगळीकडे आहे.

याप्रकारे विश्वरूप आत्म्याचे अखंड रस आहे. या विश्वरूपात माझे रूप संमिलित आहे. म्हणजे मी देखील विश्वरूपाचा अंशात्मक आहे. माझ्यासह हे विश्वरूप एक अखंड अभिन्न, अनंत, विशाल, विराट रूप आहे, हे ध्यानात आल्यानंतर, अहिंसा सत्य, अस्तेय ब्रह्मचर्य, अपरिग्रह आदिचे पालन का करावयाचे हे सांगण्याची आवश्यकताच राहत नाही. जिथे सारे एकच आहे, तिथे कोण कोणाची हिंसा करणार, कोण कोणाची प्रतारणाकणार, कोण कोणाची चोरी करणार, कोण कोणाशी व्यभिचार करणार, कोण कोणाची वस्तू पळविणार, मग तिथे शोक, मोह यांना अवसर तरी कोठून प्राप्त होणार एकत्वं अभूत् केन कं विजानीयात्, केनकं पखेत्, तत्र को मोहः कः शोकः असा या विश्वरूप दर्शनाचा व्यक्तीच्या अंतःकरणात भाव उमटतो. संपूर्ण मानव समजावा परमेश्वराचे अखंड विश्वरूप मानल्या नंतरही एका विभागाचे दुसऱ्या विभागाशी युद्ध होणे संभवनीय आहे. कारण परमेश्वराच्या स्वरूपात सर्वचभाव संमिलित असल्याने ग्रहण व त्याग या दोन्ही गोष्टी संभवतात. पौष्टिक अन्नाचा स्वीकार करताना मलाचा त्याग करणे आवश्यकच ठरते. सुष्ट व दुष्ट प्रवृत्तीचा झगडा हा नित्य राहणारच. ईश्वराला स्तेनानां पतये नमः। असे रुद्र सूक्तात म्हटले जाते. तोच ईश्वर चोर रुप धारण करून निःपक्षपातीपणाचा निर्णय व्हावा या विचाराने आपल्या समोर उभा असता, आपल्यातील न्यायदानरुपी ईश्वर त्याला शिक्षा करणार हीच भूमिका इथे सांगावयाची आहे. अशा रीतीने हे परमेश्वराचे सर्व विश्वरूप आहे. असे मानल्यासच मनुष्याकडून निर्दोष व्यवहार घेऊ शकेल. पक्षपातीपणा होणार नाही. छळ, कपट दूर होतील इत्यादी लाभ विश्वरूप परमात्म्याच्या प्रत्यक्ष अनुभवाने होऊ शकतात.

सर्वत्र अखंडता आहे, एकता आहे, हाच मानवधर्माचा पक्का पाया आहे. हाच मानवधर्म सत्य धर्म होय. जो याच्या विरुद्ध असेल तो अधर्म. अशा प्रकारे धर्म, अधर्म निर्णय योग्य रीतीने लावता येणे शक्य आहे. ईश्वर भावाने अखिल विश्वाकडे पाहताच प्रत्येकक्षणी आपले कोणते कर्तव्य आहे हे कळून येते व कोणत्याही

आईचे सौंदर्य तिच्या वात्सल्यात सामावलेले असते.

प्रकारचा संदेह राहत नाही. प्रत्येक मनुष्य स्वकर्म करत असता त्याच स्वकर्माच्याद्वारे परमात्म्याची पूजा करू शकतो. जे जे काही कर्म केले जाते. ते सारे ईश्वरार्पणच करावयाचे ही भूमिका असल्याने अनन्यत्वाने परमात्मभावच मनात उदि्त होतो.

अनन्यभाव स्थिर झाल्यानंतर मी आणि सारे विश्व मिळून एकच अखंड सत्ता असून मी परका आहे हा भाव रहात नाही. मी-तू-तो हे व्यावहारिक भेद तेथे नाहीत. सर्वत्र एकच सत्ता, यालाच अनन्य भाव म्हणतात. या नंतरच सत्य धर्माचा प्रकाश होतो.

विश्व आणि जगत्‌ - जगत्‌ - जायते गच्छति इति। जगत्‌ नाशवंत जगातील पसारा मानव निर्मित, विश्व परमात्मा निर्मित, मूळ घटक द्रव्ये परमेश्वर निर्मित-वृक्ष परमेश्वर निर्मित माती परमेश्वर निर्मित घडा, परळ आदी वस्तू मानव निर्मित वृक्ष परमेश्वर निर्मित - लाकडापासून विविध वस्तू मनुष्य निर्मित, माणूस ईश्वरनिर्मित मात्र माणसातील भेद मानव निर्मित भूमि परमेश्वर निर्मित, राष्ट्र, राज्य ही मानव निर्मित. हे सारे मिथ्या. विश्व एक अखंड सत्ता आहे. भगवंतानी विश्वरूप दाखविले आहे. जगत्‌ रूप नाही. याचे कारण लक्षात घेतल्यास समजेल विश्वरूप सत्यदृष्टी, जगतरूप मिथ्या दृष्टी. विश्वरूप दृष्टीने सर्व समान, जगत्‌रूप दृष्टीने अनंत भेद, राजाने प्रजेमध्ये विश्वदृष्टी निर्माण करावी आणि जगत्‌ दृष्टीने मिथ्या व्यवहार व त्याने होणारी भांडणे टाळावीत. एक राजा आपल्या राज्यातील व्यवस्थेचे वर्णन करताना म्हणतो. न मे स्नेनः जनपदे न कदर्यः न मद्यपः। न अनहिताग्निः न स्वैरी स्वैरिणी कुतः। माझ्या राज्यात चोर नाही, कृपण नाही, मद्यपी नाही, स्वैराचारी नाही, स्वैर स्त्री तरी कुठून असेल? विश्वरूप पाहण्यासाठी ही दिव्यदृष्टी पाहिजे. तरच परमात्म्याचे विश्वरूप मनुष्याच्या दृष्टिपथात येऊ शकते. यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावयास हवी.

भगवद्‌गीतेत दाखविलेल्या विश्वरूपात संपूर्ण विश्वरूप वर्णन नाही. फक्त विनाशक कालस्वरूपाचे वर्णन आहे. ते परिपूर्ण वर्णन होऊ शकत नाही. परमेश्वराची उत्पत्ति, स्थिति, संहार इत्यादी कार्ये आहेत, ती सर्वच्या सर्व रुपे परमात्म्याच्या विश्वरूपात संमिलित आहेत आणि ज्यावेळी साधक ती सर्वरुपे परमात्म्याच्या रूपात समाविष्ट झालेले पाहील, त्यावेळी त्याला परमात्म्याच्या विश्वरूपाचे ज्ञान झाले असे होऊ शकेल. मात्र गीतेत ईश्वराच्या संहार भावाचेच वर्णन आहे, म्हणजे येथील रूप अंशतः आहे.

हा विश्वरूपाचा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे आणि संपूर्ण धर्माधर्माचा निश्चय याच ज्ञानाने होतो. जीवनाच्या प्रत्येक पैलूत या दिव्य दृष्टीने आपले कर्तव्य जाणण्याचा प्रयत्न करावा आणि ते पूर्णपणे निभावण्याची पराकाष्ठा करावी. ईश्वरप्राप्ती विश्वरूपी परमात्म्याचा साक्षात्कार झाल्यानेच होऊ शकेल आणि मनुष्यमात्रांना धर्माधर्माचा निश्चय या योगानेच होऊ शकेल. मनुष्य कृतकृत्य होण्याचे हेच एकमेव सत्य साधना आहे. ज्यावेळी मनुष्याला हे ज्ञान होईल. त्यावेळी त्याला आपल्या कर्तव्य कर्मा विषयीच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा संदेह उत्पन्न होऊ शकणार नाही. हे दिव्य ज्ञान मनुष्याला कर्तव्यदक्ष, संदेह रहित आणि शोक मोह शून्य करणारे आहे.

अर्जुन श्रीकृष्णाला म्हणतो - आपण मला दुर्मीळ असे अध्यात्म ज्ञान सांगितले. यामुळे देहच मी, हे कौरव माझे आहेत व यांना जर मी मारले तर मला पाप लागेल असा अज्ञान जन्य अहंकार व मोह माझ्या ठिकाणी उत्पन्न झाला होता, तो आता दूर झाला आहे. मोहो इथं विगतो नम। परंतु तुमचे मूळ रूप पहावे अशी मला तळमळ लागलेली आहे. तुम्ही मला विश्वरूप दाखवाल यात तिळ मात्र संशय नाही. मात्र माझ्या अंगी मात्रता नसल्याने ते मी पाहू शकेन का? एवढे विचारण्याचा अवकाश श्रीकृष्ण

म्हणाले – हे पहा, माझे विश्वरूप, अर्जुन बिचारा स्तब्ध बसला. त्याला दिव्यदृष्टी देण्याचे श्रीकृष्ण विसरुन गेले. हे ध्यानात येताच श्रीकृष्णाने अर्जुनाला दिव्यदृष्टी दिली आणि विश्वरूप पहावयास समर्थ केले.

चराचर विश्वाचे चित्र ज्या अनादिभूमिकेवर उमटले ते विश्वरूप अर्जुन पाहू लागला. तो आश्चर्यचकित झाला. सर्वच काही विश्वरूपात व्याप्त झाले होते. सर्व सृष्टीची रचनाच नाहीशी झाली. दिशांचा मागमूस राहिला नाही. (दिशो न जाने) त्याचा मनाचा मनपणा नाहीसा झाला. त्या आनंददायक रूपाबरोबरच महामृत्युसारखी भयंकर अक्राळ विक्राळ रूपे त्यानी पाहिली. तो भयभीत झाला. त्या आनंददायक रूपाबरोबरच हे भयंकर रुप पाहवेना. त्याने डोळे मिटून घेतले. दिव्यदृष्टीच्या प्रकाशामुळे डोळे मिटले असताही विश्वरूप दिसू लागले. हे सर्व जग महासागरातील बुडबुड्याप्रमाणे भासू लागले. त्याच्या ठिकाणी अष्ट सात्विक भाव निर्माण झाले. काही वेळाने ते भाव ओसरले. त्यानंतर त्या विराट रूपाची तो स्तुती करू लागला.

मी यःकश्चित मानव आपल्या थोरपणामुळे हे विश्वरूप पाहू शकलो. आतापर्यंत माझ्या दृष्टीवर अज्ञानाचे पटल होते. मी तुम्हांला श्रीकृष्णच समजत होतो. आज मला तुमचे सारे रूप समजले. या रुपाने मी भयभीय झालो आहे. हे सारे कौरव वीर व त्यांचे सैन्य तुमच्या मुखात भरडले जात आहेत व नष्ट होत आहेत.

मी मारणारा व हे मरणारे या अहंकाराने अर्जुन ग्रासला होता. तो अहंकार दूर करावा म्हणून श्रीकृष्णाने विश्वरूप दर्शनाच्या निमित्ताने ती संधी साधली व आपले अद्‌भुत असे रुप त्याने अर्जुनाला दाखविले. या रूपाच्या दर्शनाने अर्जुनाच्या ठिकाणचा मोह नाहीसा झाला व त्यातून निर्माण होणारा शोक पण नाहीसा झाला. सर्व संहार करणारा तो मीच आहे; तू निमित्त मात्र आहेस. हे अर्जुनाच्या मनावर बिंबले. अर्जुन श्रीकृष्णाला शरण गेला. वारंवार भगवंताला नमस्कार करून गद्‌गदित स्वरात म्हणाला – मी तुमची थट्टा मस्करी केली. बरोबरीचा समजलो, मला माझी चूक ध्यानात आली. तुम्ही मला क्षमा करा. आजपर्यंत कोणालाही असे अद्‌भुत रूप पाहावयास मिळाले नाही ते मी पाहिले. पण कृष्णा तुम्ही मला पूर्वीसारखेच हवे आहात. अर्जुनाच्या प्रेमास्तव हे रूप दाखविले. देवादिकांनाही असे रूप पाहण्याची खूप इच्छा आहे. त्यांना देखील असे रूप दर्शन दुर्लभ आहे.

पुनः पूर्वीचे रूप धारण करून कृष्ण अर्जुनाला म्हणाला – अर्जुना, असे रूप फक्त अनन्य भक्तीनेच अनुभवाला येते. या विश्वरूप दर्शनाने अर्जुनाला परमेश्वराचे सगुण साकार व्यक्त रूपाचे दर्शन घडले. परमेश्वराच्या या विश्वरूपात संपूर्ण मानवजाती, संपूर्ण पशुपक्ष्यांच्या जाती, संपूर्ण वृक्ष वनस्पतींच्या जाती तसेच विश्वात जे जे काही अंतर्भूत आहे ते सर्व अखंड रुपाने एकवटलेले त्यांनी पाहिले. हा एकात्मभाव त्याच्या अंतःकरणात पूर्णांशाने ठसला व त्याचा मोह दूर होऊ लागला.

**कै. शं. बा. मठ**

●●●

**दिशासाठी**

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# ग्रंथालय संगणकीकरण आणि ग्रंथपालांची मानसिकता

*नवीन संकल्पना, बदल समजावून घेण्यासाठी संबंधितांची स्वीकारशील मानसिकता आवश्यक आहे. हा मुद्दा या लेखात अधोरेखित झाला आहे. – संपादक*

**प्रस्तावना**

मानवाच्या अल्प सहभागाने पूर्ण कार्यरत होणाऱ्या यांत्रिक वस्तूला 'स्वयंचालित वस्तू' असे म्हणतात. पूर्वीच्या काळी ग्रंथालय स्वयंचालितीकरण ही संज्ञा पारंपरिक ग्रंथालयीन कामकाजात यंत्राच्या सहभागाबद्दल वापरली जायची. परंतु संगणकाच्या वाढत्या उपयोगानंतर संगणकाद्वारे केलेल्या ग्रंथालयाच्या आधुनिकीकरणाला ग्रंथालय स्वयंचलितीकरण (Library Automation) म्हटले जाऊ लागले. संगणक हे माध्यम इतके उपयुक्त ठरले आहे की, स्वयंचालितीकरणाला संगणकीकरण (Computerisation) हा जणू प्रतिशब्दच बनला आहे.

**स्वयंचालितीकरण (Automation)**

डी. एस. हार्डर यांनी इ.स. १९३६ मध्ये स्वयंचालितीकरण ही संज्ञा सर्वप्रथम आपल्या एका लेखात मांडली. त्यात त्यांनी असे स्पष्टीकरण दिले होते की अभियांत्रिकी उद्योग समूहातील उत्पादन, प्रक्रिया अशा विभागांतील यंत्राची स्वयं हाताळणी म्हणजे स्वयंचालितीकरण होय. मात्र पुढे संगणकाच्या वाढत्या प्रभावामुळे स्वयंचालितीकरण हे फक्त अभियांत्रिकी क्षेत्रापुरते मर्यादित न राहता, ते इतरही क्षेत्रात पसरले.

**ग्रंथालय संगणकीकरण**

पूर्वीच्या काळी ग्रंथालय संगणकीकरण हे ग्रंथालयाच्या यांत्रिकीकरणाशी निगडित होते व त्याद्वारे ग्रंथालयातील उपार्जन, देवघेव, तालिकीकरण, नियतकालिक नियंत्रण अशी पारंपरिक कामे पार पाडली जात. पण, आता बदलत्या संकल्पनेनुसार, पारंपरिक कामांबरोबरच माहितीचे संघटन, संग्रहण, प्रतिप्राप्ती, तसंच प्रसारण अशा आधुनिक सेवाही संगणकाद्वारे दिल्या जातात.

**व्याख्या**

१) वेबस्टर शब्दकोश : ग्रंथालय संगणकीकरण म्हणजे ग्रंथलयातील एखादी प्रक्रिया किंवा पद्धती स्वयंचलितपणे हाताळण्याचे तंत्र होय.

२) ग्रंथालयातील पारंपरिक कामे उदा. उपार्जन, नियतकालिक नियंत्रण, तालिकीकरण, माहिती प्रतिप्राप्ती इ. यंत्र अथवा संगणकाद्वारे करण्याच्या पद्धतीला ग्रंथालय संगणकीकरण असे म्हणतात.

**संगणकीकरणाची ग्रंथालयातील आवश्यकता**

ग्रंथालयाचे संगणकीकरण करणे आवश्यक झाले आहे. त्याची काही कारणे अशी आहेत.

१) सूचीय नोंदीतील विविधता
२) नोंदीतील नोंदक्षेत्राची वारंवारता (Repeatation of Fields in the Entry)
३) संग्रहण क्षमतेची भव्यता (Wide capacity of storage)
४) माहिती अद्ययावत राखण्यातील नियमितपणा
५) नोंदीतील अचूकता
६) व्यावसायिक कर्मचाऱ्यांना दैनंदिन मदत (Routine)
७) मानवी चुका कमी होतात.

---

ज्या दिवशी स्वप्ने हरवतात, त्याच दिवशी विचार खुंटतात आणि ज्या दिवशी विचार खुंटतात, त्याच दिवशी स्वप्नेही विरुन जातात.

८) वाचकांमध्ये संगणक साक्षरता निर्माण होते.

९) उपलब्ध कर्मचाऱ्यांमार्फत जादा कार्य करता येऊ शकते.

१०) प्रलेखांसंबंधी सर्व माहिती एका 'क्लिक'वर उपलब्ध होते.

**ग्रंथपालांची मानसिकता**

संगणकीकरणात सांप्रतच्या स्थितीतील बदल अपेक्षितच असतो. तो स्वीकारण्याची व्यवस्थापन, तसेच कर्मचाऱ्यांची चटकन तयारी होत नाही. हे तंत्रज्ञान आर्थिक दृष्टचा खूप खर्चिक असेल अशा अंदाजाने व्यवस्थापनाकडून आवश्यक ते प्रोत्साहन मिळत नाही. तसेच, प्रशिक्षणाला वेळोवेळी सामोरे जावे लागेल किंवा कर्मचारी भरतीवर परिणाम होईल अशा भीतीने ग्रंथालयीन कर्मचारी नाखूष असतात. पण एकदा का बदल स्वीकारायचा, हे निश्चित झाल्यावर ग्रंथपालाला मागे राहता येत नाही. सकारात्मक मानसिकतेसह त्याला संगणकीकरणात सहभागी व्हावे लागते, एवढेच नव्हे, तर त्याला पुढाकारही घ्यावा लागतो. त्यासाठी त्याला –

- माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात स्वतःबरोबर ग्रंथालयाचाही विकास कसा होईल ते पहावे लागते.
- संगणकीकरण झालेल्या इतर ग्रंथालयांस भेट देऊन प्रक्रिया समजून घ्यावी लागते.
- ग्रंथालयास उपयुक्त अशा आज्ञावली संस्थांतर्गत तयार करून/ आयती विकत घ्यावी लागते.

संगणकीकरणाच्या प्रक्रियेत ग्रंथपालांना प्रारंभिक स्वरूपाची काही माहिती असावी. उदा.

• **पद्धतीची गरज (System Requirement) :** ग्रंथालय संगणकीकरणाची गरज ओळखून त्या संबंधित पद्धतीची माहिती जाणून घेणे.

• **आज्ञावलीचे तर्कशास्त्र (Programming Logic)** संगणकीकरणात वापरण्यासाठी सुयोग्य अशी संगणक आज्ञावली प्राप्त करणे व तिच्यासाठी आज्ञावलीचे तर्कशास्त्र समजून घेणे.

• **स्त्रोत पद्धती (Resource System)** : डेटाबेस, डेटा फॉर्मेट व मेटाडेटा यांबाबतचे ज्ञान, इंटरनेट तंत्रज्ञान, माहिती शोध व सादरीकरण, डिजिटल ग्रंथालय संकल्पना इ. स्त्रोत पद्धतींची माहिती जाणून घेणे.

**प्रशिक्षणाच्या संधी**

संगणकीकरणाचे प्रशिक्षण घेण्याच्या बऱ्याच संधी ग्रंथपालांना उपलब्ध आहेत. त्यांतील काही पुढे दिल्या आहेत.

१) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांसारख्या विद्यापीठांतून या विषयाच्या अभ्यासक्रमात थेट समावेश केलेला आहे.

२) इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठातून PDG LAN (Post Graduate Diploma in Library Automation Network) हा स्वतंत्र वर्ग चालवण्यात येतो.

३) मुंबई, पुणे वगैरे विद्यापीठांचे ग्रंथालय व माहिती शास्त्राचे विभाग दरवर्षी उजळणी वर्गाचे (Refresher Courses) आयोजन करतात. त्यांच्या कार्यक्रमांत या विषयावर अध्यापन, चर्चा व मार्गदर्शन यांचा समावेश असतो.

४) पुढील संस्था या विषयावर थोड्या कालावधीचे वर्ग आयोजित करतात. INFLIBNET, DRTC, IASLIC

५) या विषयावर विविध वार्तापत्रे, नियमितपणे प्रसिद्ध केली जातात. उदा. Library News Letter

६) इंटरनेटवर काही संकेतस्थळे उपलब्ध आहेत. उदा. **www.infolibrarin.com**

---

दुसऱ्यांच्या मार्गातील अडथळे दूर करू शकत नसाल, तर किमान दुसऱ्याच्या मार्गातील धोंडा तरी बनू नका.

### समारोप

सध्याचं युग हे स्पर्धेचं आहे. त्यामुळे जग फार वेगाने प्रगतिपथावर धावत आहे. या बदलत्या परिस्थितीला अनुसरून ग्रंथालयांचे आधुनिकीकरण व संगणकीकरण करणे गरजेचे झाले आहे. त्याची सुरुवात ग्रंथपालांच्या मानसिकतेत बदल होण्यापासून केली जाते. प्राप्त प्रशिक्षणाच्या कोणत्याही संधीचा लाभ घेऊन ग्रंथपाल ग्रंथालयाचे संगणकीकरण करून घेऊ शकतो.

### संदर्भ ग्रंथसूची

1) Dand, V.R.(2004), Library Automation : Why and How? in Modern Trends in Library and Information science, p.47-50

2) Deshmukh, shamkant J. (2004), Library Automation in Modern Trends in Library and Information science, p.67-68

3) Landge, S. G. (2004), Library Automation : Need of Time in Modern Trends in Library and Information science, p.65-66

4) www.ehow.com / Date : 18/03/2011

5) फडके, द. ना. (2007) : ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, आ. 2, युनिव्हर्सल प्रकाशन, पृ. 440

**–प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये**
ग्रंथपाल,
स्वामी विवेकानंद रात्र महाविद्यालय,
दत्तनगर, आयरे मार्ग,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१,
smathalye42@gmail.com.

●●●

## चिंतन

संस्था ही कोणतीही असो,
सरकारी, सहकारी,
खाजगी वा धर्मार्थ,
संस्थेत ठरावीक काम करणे,
हा झाला कायदा.
पण कामात स्वत:ला झोकून देणे,
ही झाली नैतिकता.
मी पगार घेतो म्हणून काम करतो,
हा झाला व्यवहार.
संस्थेच्या अस्तित्वाची,
सुरक्षिततेची, प्रतिष्ठेची
योग्य काळजी घेण्याचे कार्य
मला पार पाडावयाचे आहे,
ही झाली आपुलकी.
संस्थेची प्रगती आहे तोवर माझे
अस्तित्व कायम आहे.
माझी प्रतिष्ठा आहे म्हणून संस्थेला
हानिकारक ठरेल,
अशी कृती मी कधीही करणार नाही.
पण सामाजिक ऋण
फेडण्याच्या भावनेने,
स्वत:ला कामात वाहून घेईन.
ही प्रत्येकाची भावना असली पाहिजे,
यातच देशाचा विकास व
स्वत:चा उद्धार आहे.

प्रत्येकाच्या मनात दोन बैलांची झुंज सुरू असते. चांगुलपणा आणि वाईटपणा.
ज्याला तुम्ही जास्त चारा घालता, तोच जिंकतो.

# कै. राजाभाऊ भावे-ठाण्याचे ''सत्वस्थ'' ज्ञानप्रेमी व्यक्तिमत्त्व
## (जन्म : ३/११/१९०८ – निधन : ९/११/१९८२)

*कै. राजाभाऊ भावे यांच्या आठवणींना दिलेला उजाळा – संपादक*

राजाभाऊ भावे यांचा माझा परिचय मी ठाण्यात रहात असूनही खूप उशीरा झाला. परंतु त्यांचे वडील सारस्वतकार वि. ल. भावे यांनी स्थापन केलेल्या मराठी ग्रंथ संग्रहालयाचा सहवास, ग्रंथ संग्रहालय ठाणे म्युनिसिपालीटीच्या समोरच्या जागेत होता, तेव्हापासूनचा होता. शाळेतून कॉलेजमध्ये गेल्यावर ''मराठी'' हा विषय घेतल्यामुळे महाराष्ट्र सारस्वताचा अभ्यास करावा लागला. त्यातील गोडव्याने मी मोहित झालो. भाव्यांचे मासुंदा तलावाजवळील घर दुरून पाहण्याचेच अप्रूप वाटत असे. हे सारस्वतकारांचे घर. त्यामुळे घरावरून जाताना दबदबा वाटे. स्वातंत्र्यपूर्व काळातले ठाणे वैचारिक सभांनी गजबजलेले असे. येथे चर्चा मंडळे होती. व्याख्यानमाला भरत असत. त्यांतूनच ठाण्याच्या थिऑसॉफिकल सोसायटीचे अध्वर्यू प्रा. रा. स. भागवत यांचा परिचय झाला. माझा पिंड तत्त्वज्ञानात रमणारा. त्यामुळे भागवतांकडे माझा मित्र शरद गोखले व मी वेळ मिळेल तसे जात असू. भागवतांच्या सहवासामुळे आम्ही जे. कृष्णमूर्तींच्या व्यक्तिमत्त्वाकडे आकर्षिलो गेलो व अनेक वर्षे मुंबईस होणाऱ्या जे. कृष्णमूर्तींच्या सभांस, चर्चासत्रांस जाऊ लागलो. त्यावेळेस मला तेथे राजाभाऊ जवळून पाहावयास मिळाले. काळा कोट, काळी टोपी, गोरेपान शरीर, कासोट्यांचे धोतर; असे एक मराठमोळे व्यक्तिमत्त्व कृष्णमूर्तींच्या अगदी आतल्या वर्तुळातले असूनही सर्वांतच बसलेले असे. रावसाहेब पटवर्धन, अच्युतराव पटवर्धन, दादा धर्माधिकारी, फ्रीडमन इत्यादी मंडळी राजाभाऊंना आवर्जून भेटत. परदेशी मंडळीही आदराने नमस्कार करून जात. पण राजाभाऊ खूप साधे. त्यामुळे त्यांचेविषयी आकर्षण वाढले. पण एक दराराच वाटे; ठाण्याच्या मंडळीचा कृष्णमूर्तींच्या सभेस येणारा एक ग्रुप होता. राजाभाऊंचे येणे–जाणे त्यांचेबरोबर नसे. आम्ही सर्व ट्रेनने जायचो. राजाभाऊ कारने जात. त्यामुळे परिचय झाला नाही. परंतु ठाण्याच्या मंडळींकडून कळले की राजाभाऊंच्या ठाण्याच्या घरी दर रविवारी सायं. ५।। ते ६।।–७ बैठक असते. कोणीही यावे गप्पा ऐकाव्या. गप्पांत भाग घ्यावा. त्यांनी मला यायचा आग्रह केला व नंतर मी दर रविवारी त्यांचेकडे जाऊ लागलो व मग असा परिचय वाढत गेला. राजाभाऊंच्या चर्चासत्रांत मी भाग घेत असे. कृष्णमूर्तींचे म्हणणे समजून घेणे, त्यांतील बारकावे टिपणे, त्याचबरोबर भारतीय तत्त्वज्ञान, भारतीय समाज, बौद्ध आदि धर्म, थिऑसॉफिकल सोसायटी यांचे संबंधी वादविवाद होत. खूप नवीन माहिती मिळे. परंतु आठवते ते असे की, राजाभाऊ स्वतः मात्र अटीतटीने भाग घेत नसत. विजय मात्र ठोस मुद्दे मांडे. राजाभाऊ हे त्यांच्या खोलीच्या उंबरठ्यावरच बसत. आम्ही खुर्चीत बसत असू. मात्र राजाभाऊ चर्चा गतिमान व्हावी म्हणून उपस्थित लोकांस बोलते करीत. स्वतःविषयी काहीच बोलत नसत. जे. कृष्णमूर्तींच्या इतक्या जवळचा माणूस, कोपिनेश्वर मंदिराचा व मराठी ग्रंथसंग्रहालय विश्वस्त इतका साधा, सौम्य, निगर्वी, अनाग्रही कसा, याचे मला राहून राहून आश्चर्य वाटे. मलाच नव्हे, तर तेथे आलेल्या प्रत्येकास असे वाटे की राजाभाऊंना आपण खूप आवडतो. एक भारदस्त व प्रेमळ असे ते व्यक्तिमत्त्व होते. दि. २२.७.७७ रोजी मी राजाभाऊंचे व्यक्तिमत्त्व शद्बांकित करण्याचा प्रयत्न केला होता ते टिपण असे.

---

एका ज्ञानवंताची ताकद हजार अडाण्यांपेक्षा जास्त असते.

राजाभाऊ हे थिऑसॉफिकल सर्कलमध्ये आतील वर्तुळातले आहेत. जवळ जवळ पन्नास वर्षे त्यांचा त्यांच्याशी संबंध आहे. जे. कृष्णमूर्ती यांचा विचार त्यास योग्य वाटतो. त्यांच्या वाङमयाच्या विचारांचे चिंतन मनन हा राजाभाऊंच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. जे. कृष्णमूर्तींच्या सर्व वाङमयाचा संग्रह त्यांचे घरी आहे. कृष्णमूर्तींबरोबर आपण फार जवळून वावरलो आहोत, त्याचप्रमाणे ट्रॅडिशन ॲण्ड रेव्हॉल्यूशन Tradidtion & Revolution या पुस्तकाची जडणघडण प्रत्यक्ष पाहिलेली आहे, असे त्यांचेकडून समजले. श्रेष्ठ मराठी साहित्यिक व समीक्षक श्री. के. क्षीरसागर व कृष्णमूर्ती यांची भेट त्यांनीच पुणे येथे घडवून आणली होती व त्या भेटीनंतर श्री. के. क्षीरसागर डोळे पुसत बाहेर आले, असे आपण स्वतः पाहिल्याचे ते म्हणाले. श्री. के.च्या 'तकदीर व तसबीर' या आत्मचरित्राच्या पुस्तकात या प्रसंगाचा उल्लेख आहे, त्याला त्यांनी पुष्टी दिली.

एकदा राजाभाऊ म्हणाले, '' हे पहा, मी जवळजवळ ४०-५० वर्षे कृष्णमूर्तींच्या सान्निध्यात आहे. एक एक मैल दूर आम्ही दोघेच फिरावयासही गेलेलो आहोत. किती वेळ त्यांनी माझ्या खांद्यावर हात टाकून आम्ही फिरलो आहोत. परंतु मला मात्र भावनोत्कटतेचा असा कधीच अनुभव आला नाही. कोणी म्हणतात, की कृष्णमूर्ती जवळून गेले तरी Electric Current (विद्युत प्रवाह) चा अनुभव येतो. परंतु मला तसा अनुभव नाही. एक तर माझी पात्रता नसावी, अगर ते तसा Electric Current (विद्युत प्रवाह) वगैरे सोडत नसावेत. परंतु मला अनुभव नाही एवढे मात्र खरे.'' अशा प्रकारे आपण स्वतःस अगर कृष्णमूर्तींना Hero (हिरो) बनवण्याची लौकिक वृत्ती त्यांच्यात नाही. हे पाहून मला आश्चर्यच वाटले. कृष्णमूर्तींविषयी त्यांना परम आदर आहे. तो आदर कृष्णमूर्ती जी विचारांची मांडणी करतात, त्यामुळे आहे. कृष्णमूर्तींचे विचार हे जगाच्या नव-संस्कृतीचे एक अभिनव दर्शन आहे, असे त्यांना वाटते. मानवी संस्कृतीच्या बौद्धिक विकासानंतर अंतःसंवेदना (Inspiration, Intuition) चे नवीन युग येणार आहे व त्यांचे ते उद्गाते आहेत. जगात इतके प्रखर, निःसंदिग्ध व तळमळीने विचार मांडणारा कोणीही नाही, असे त्यांचे मत आहे. ते म्हणाले की कृष्णमूर्तींवर धोपेश्वर वगैरेचे भाष्य करणारे ग्रंथ मी विशेष रस घेऊन वाचीत नाही. त्यापेक्षा कृष्णमूर्तींवर डायरेक्ट, कृष्णमूर्तींच वाचणे मी पसंत करतो. कारण कृष्णमूर्तींचे म्हणणे त्यांचेच शब्दांत ऐकावे. इतरांच्या मतांनी, वाक्यांनी ते कदाचित बिघडले जाण्याची भीती आहे. मी त्यांना अत्रेंच्या Management Constant यांचे एक पुस्तक वाचण्यास दिले होते. त्या पुस्तकांतील शेवटचा कृष्णमूर्तींचा Listening वरील उतारा त्यांनी मला मोठ्याने पूर्णपणे वाचून दाखवला. त्यांचे वाचन स्पष्ट, सरळ व प्रेमाने भरलेले होते. खूप एकाग्रतेने त्यांनी वाचन केले.

राजाभाऊ एकदा म्हणाले की, Brain Mutation ची कल्पना त्यांनी मला स्प्ष्ट करून सांगितली. ते म्हणाले, ''एनफ्लूएंझा ज्या रोगाचे जंतू सापडले, त्याच्यावर एक औषध काढले. परंतु ते औषध नेहमीच पुढे उपयोगी पडत नाहीसे झाले. कारण असे की औषध खाल्लेल्या एनफ्लूएंझाच्या जंतूंपासून जी नवीन प्रजा उत्पन्न होते ती पहिल्या जंतूपेक्षा निराळीच असते. अगदी वेगळीच अशी होत असते. त्यामुळे त्या जंतूंना जरी एनफ्लूएंझाचे जंतू म्हटले तरी त्यांची धारणा बदललेली असते. त्याप्रमाणे कृष्णमूर्तींचे जीवन दर्शनामुळे आपल्या मेंदूच्या Brain Cells मध्ये जो फरक पडेल, तो इतका नवीन असेल की, त्या मेंदूस माणसास – पूर्वीच्या गोष्टी, कृती, विचारपद्धती, सवयी सर्व आकर्षित करणारच नाहीत. तो मुक्त निःसंग असेल, ती प्रज्ञाच नवीन प्रतिमा असेल.

असेच एकदा मी त्यांना सांगितले की प्रा. सायनेकर यांस तुम्हांस भेटण्याची इच्छा आहे. ते म्हणाले, कशाकरिता? मी म्हटले की तुमचा कृष्णमूर्तींचा अभ्यास, व्यासंग, सहवास यामुळे आपल्याशी बोलावे असे वाटते.

---

गाडी डोंगराच्या उतारावर लागली की पेट्रोल शिवाय सरळ खाली उतरते.

ते म्हणाले, ''त्यांना जरूर घेऊन या. मलाही त्यांना भेटण्यास आवडेल. पण त्यांना एक मात्र सांगा की मी अगदी सामान्य माणूस आहे. मला कृष्णाजी पूर्णपणे कळले आहेत असे वाटत नाही. मी त्यांच्यापेक्षा विद्वत्तेने, ज्ञानाने अनुभवाने कमी आहे. अगदी सर्वसामान्यासारखाच आहे, एवढेच त्यांना सांगा.'' केवढी विनम्रता!

एकदा ते मला म्हणाले - परांजपे, मी खरे सांगू का की साध्या साध्या गोष्टींत प्रतिष्ठा, मोठेपणा याची माणसाला इतकी ओढ आहे. मला ती मुळीच नको असते. आमच्या मागे जो मासुंदा तलाव आहे, तो आम्ही सर्वांनी साफ केला. पण त्यासाठी फोटो, भाषणे, उद्‌घाटन काही करू नका असे मी सांगितले होते. ही कोपिनेश्वरची ज्ञान-केंद्र लायब्ररी चालू करा, चालू झाली आहे असं जाहीर करा.

एवढेच, अशी सात्विकता, अध्यात्मिक विचारांतही संकुचितपणा कसा असतो त्यांची त्यांनी एक आठवण सांगितली. ते म्हणाले, प्रसिद्ध लेखक ल. रा. पांगारकर आमचे वडिलांकडे येत असत. येथेच या हॉलमध्ये झोपत असत. आमची अंथरूणे अशी - पांगारकर, वडील व मी अशी असत. मी लहान होतो. तेव्हा एकदा पांगारकर बोलता बोलता वडिलांस रागाने म्हणाले, त्या सटवीला गीतेचा अभ्यास करण्याचा काय अधिकार आहे(सटवी म्हणजे ॲनी बेझंट).

मी म्हणालो, दादा, त्यात काय झाले. अध्यात्म म्हणजे देव-भक्ती. देव तर सर्वांचा पिता. मग आपले ग्रंथ कोणी ख्रिश्चनाने वाचले तर त्यात काय चुकले? ते म्हणाले, तुला कळत नाही. अरे आपल्या परंपरा आहेत. त्यांना सोडून कोणी वागू नये. ढवळाढवळ करू नये. तुला मी सांगितले की तू जानवे तोडून टाक, त्या जानव्याचा काही उपयोग नाही. तुला तोडवेल का ते?

मी म्हणालो, त्यात काय मोठे. खरेच मी संध्या करीत नाही. शिवाय मला ते क्रिकेट खेळताना बॉलिंग करताना फार अडचणीचे होते. असे म्हणून त्यांचे समोर, वडिलांच्याही समोर हे घ्या तोडून टाकतो असे म्हणून जानवे तोडून टाकले. पांगारकर माझ्यावर फार भडकले. पण मला अजूनही पांगारकरांचा हा एकांगीपणा मूर्खपणाचा वाटतो. आपला विचार गुंडाळून ठेवायचा, यात काय शहाणपणा? त्यांत पांगरकरांसारखा अध्यात्म मुळापासून वाचलेला प्रवचनकार! असे हे अध्यात्मवादी परंपरावादी धार्मिक लोकांचे विवकशून्य वागणे, विचार मला आवडत नाहीत.

असे होते राजाभाऊ विवेकी, ज्ञानी पण अगदी साधेसुधे.

राजाभाऊंचे निधन ९.११.१९८२ रोजी झाले. राजाभाऊंच्या काही आठवणी कायमच्या स्मरणात राहिल्या आहेत.

एकदा ते म्हणाले - मी विजयला (मुलाला) त्या काळांत इंग्रजी मिडियमच्या सेंट जॉन हायस्कूलमध्ये घातले. लोकांनी माझा उपहास केला. ज्यांच्या वडिलांनी मराठी भाषेसाठी ग्रंथ रूपाने व ग्रंथालयरूपाने मराठीसाठी जीवन अर्पण केले. त्यांचे चिरंजीव असे मराठीच्याऐवजी इंग्रजी शाळेत घालतात. मी सांगत असे- मराठी भाषेवर माझेही प्रेम आहे. परंतु यापुढे इंग्रजी हीच विश्वभाषा होणार आहे. तेव्हा आपल्या मुलांनी त्या भाषेचे अध्ययन करणे आवश्यक आहे. आज तर माझे त्यावेळचे वागणे चुकले मला असे वाटत नाही.

मी माझ्या मुलांनी शाकाहारीच असावे असा आग्रह धरला नव्हता. मात्र, एकदा मी विजयला घेऊन चेंबूरला कत्तलखान्यावर गेलो व त्या निष्पाप मूक प्राण्यांची मनुष्यप्राणी आपले पोट भरण्यासाठी कशी क्रूरपणे हत्या करीत आहे व त्या मूक प्राण्यांच्या डोळ्यांत किती अश्रू आहेत ते पहा व तूच काय ते ठरव असे विजयला सांगितले. तो शाकाहारी आहे. पण त्यामध्ये करुणाभाव आहे याबद्दल मला अभिमान वाटला.

---

ज्यांची विचार करण्याची शक्ती फारच कमी पडते, त्यांच्या अंगात येते.

मी कोपिनेश्वर या पारंपरिक मंदिराच्या ट्रस्टचा अध्यक्ष आहे व मुक्त चिंतन करण्याच्या व परंपरेवर तुटून पडण्याच्या विचारांच्या कृष्णमूर्तींचाही भक्त आहे हे पाहून बऱ्याच लोकांना मी ढोंगी आहे असे वाटले. परंतु याबाबत माझी अशी धारणा आहे ही मानवी जीवनाच्या हे दोन Streams (प्रवाह) आहेत व ते प्रवाह असेच चालू राहणार आहेत. दोनही Streams (प्रवाह) थोड्याफार प्रमाणात उपयुक्त आहेत. म्हणून, प्रत्येकाने स्वेच्छेने काय तो निर्णय घ्यावयाचा असतो. त्या Streams (प्रवाह) ची चांगली व्यवस्था ठेवणे हे माझे ट्रस्टी या नात्याने काम आहे ते मी करण्यात काय ढेंग आहे. मी काही धर्म-प्रचारक नाही. मी एक सेवाभावी कार्यकर्ता आहे. ज्ञानकेंद्र ग्रंथालयातून या दोन्ही Streams (प्रवाहां) चा अभ्यास व्हावा अशी भूमिका आहे.

कोपिनेश्वर मंदिराच्या गाभाऱ्याला मागील दरवाजा काढण्याचे मी सांगितले. खूप विरोध झाला. ही परंपरा नाही इ. सांगितले. माझे कुटुंबियास त्रास होईल असे सांगितले गेले. पण मी म्हटले, मला तसे वाटत नाही काशी-विश्वेश्वराच्या देवळास दोन दरवाजे आहेत. मला खोट्या परंपरा आवडत नाही. म्हणून दरवाजा काढून घेतला.

सारस्वतकार वि. ल. भावे यांनी मराठी ग्रंथसंग्रहालय स्थापले तर त्यांचे चिरंजीव राजाभाऊ यांनी ज्ञानकेंद्र ग्रंथालय स्थापन केले.

अशा एका सत्वस्थ ज्ञानप्रेमीला अगदी जवळून पाहण्याचे, त्यांचेशी बोलण्याचा मला योग आला हे मी माझे भाग्य समजतो.

**– श्री. ह. श्री. परांजपे**
२०१, मनसुबा सोसायटी,
राम गणेश गडकरी मार्ग,
ठाणे (प.) – ४०० ६०२
फोनः २५३९५०३८

## विद्या प्रसारक मंडळाचे स्वप्न

*वेळणेश्वर पाहिलं,*
*ऐकली गाज समुद्राची.*
*परशुरामाने कोकण निर्माण केलं ...*
*त्याचाच आवाज तो*
*या सर्वांशी नातं जोडलं*
*आमच्या विद्या प्रसारक मंडळाने*
*टाकत दोन पावले पुढे*
*ओळखून गरज काळाची*
*परशुरामाच्या हातातील परशु घेत*
*घातला घाव कोकणच्या कातळावर*
*आणि सुरू झाली कहाणी*
*विराट स्वप्न प्रत्यक्षात येण्याची ...*
*अभियांत्रिकी गुरुकुलाची ओळखत गरज*
*वर्तमानाचे आरोग्य जपणाऱ्या*
*आमच्या डॉक्टरांनी*
*स्टेथस्कोप लावला कोकणच्या मातीला*
*तिची नाडी ओळखत*
*केली धडपड सुरू*
*डॉक्टरांची विजय मिळवणारी स्पंदने ऐकत*
*समुद्रही घाबरला.*
*आता आपला प्रतिस्पर्धी समोर आहे*
*असा विचार करत, क्षणभर थरारला ...*

**– मोहन पाठक**

●●●

उपासनेने मनाला आधार मिळतो.

# सहकार क्षेत्राचं चांगभलं

*सर्वोच्च न्यायालयाने सहकार क्षेत्राबद्दल दिलेल्या निकालाच्या संदर्भातील लेख - संपादक*

दि. १५ ऑक्टोबर २०१३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने सहकारी संस्था माहिती अधिकाराच्या कक्षेत येत नसल्याचा निर्वाळा दिला. केरळमधील एका सहकारी बँकेच्या गुंतवणूकदारांनी माहिती अधिकाराखाली अर्ज करून बँकेच्या व्यवहारांची माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आणि बँकेने तो हाणून पाडला. हे प्रकरण केरळ उच्च न्यायालयासमोर गेले असता न्यायालयाने सर्व सहकारी संस्था माहिती अधिकाराच्या कक्षेत येतात; म्हणजेच या सार्वजिनिक संस्था असून यामध्ये सरकार, नागरिक आणि प्रर्वतक यांच्या हितांची जोपासना करण्याच्या उद्दिष्टाने अशा संस्था निर्माण केल्या जातात असा निर्णय दिला.

उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयामध्ये गेले असता, सर्वोच्च न्यायालयाने सहकारी संस्था या सरकारकडून केवळ नियंत्रित किंवा पर्यवेक्षित केली जाणारी संस्था आहे. त्यामुळे, अशा संस्थांना सार्वजनिक संस्था म्हणता येणार नाही आणि परिणामतः माहितीचा अधिकार त्यांना लागू करता येणार नाही. असा निर्णय दिला. इतकेच नाही, तर ज्या सहकारी संस्था सरकारी अनुदानावर चालतात त्यांनाच माहितीचा अधिकार लागू होतो अशी पुष्टी देखील न्यायालयाने जोडली. या निर्णयाचा नक्की परिणाम काय होणार, याचा फायदा कुणाला, तोटा कुणाला या प्रश्नांची उकल करावयाची असेल तर सहकार क्षेत्राच्या उगमापासून त्याच्या विकासाकडे कटाक्ष टाकावा लागेल.

सहकार चळवळीचा इतिहास १९०४ पासून प्रामुख्याने अस्तित्वात आला. सहकार म्हणजे काय? तर आर्थिक, कायदेविषयक आणि नैतिकतेच्या आधारावर राज्याकडून सहाय्य मिळविणे. भारत दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर (१९४६-१९४८) पुनर्निर्मितीच्या टप्प्यावर असताना राजकीय, सामाजिक आणि आर्थिक सुव्यवस्थेच्या शोधात असताना सहकाराच्या तंत्राने या देशाला नवीन मार्ग दिला. धान्य, खाण्याचे पदार्थ, कापड आणि इतर गृहोपयोगी वस्तू पुरवण्यासाठी सहकाराच्या तत्त्वाचा वापर प्रभावशाली ठरणारा होता.

स्वतंत्र भारताच्या संविधानाने भाग-४ मध्ये निर्देशक तत्त्व अनुच्छेद ३८ (१) व (२) यामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे राज्याने लोककल्याण संवर्धनपर समाज व्यवस्था प्रस्थापित करावी, त्याचबरोबर अनुच्छेद ३९ मध्ये राज्यावर काही जबाबदाऱ्या टाकण्यात आल्या होत्या. त्यामध्ये जनसामान्यांच्या हितासाठी भौतिक साधन संपत्तीचे नियंत्रण आणि वाटप, आर्थिक यंत्रणा राबविताना धनदौलतीचा व उत्पादन साधनांचा संचय एकाच ठिकाणी होऊन देणे या मूलभूत गोष्टींचा अंगिकार करून आर्थिक सामाजिक धोरणाचा विकास करण्याची जबाबदारी राज्यावर सोपविण्यात आली होती.

महाराष्ट्र सरकारने हाच धागा पकडून लोकल्याणकारी राज्य म्हणून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व सहकारी संस्था नियम १९६१ या दोन कायद्यांची निर्मिती केली. महाराष्ट्रामध्ये सहकारी बँका, शिखर बँका जिल्हा बँका सूत व कापड गिरणी, साखर कारखाने, मत्सोद्योग, दूध सहकारी संघ, ग्रामीण

पतसंस्था, कृषी उत्पन्न समित्या, शेती खते व अवजारे पुरवठा समित्या इ. यांचे जाळे या कायद्यानुसार अधिकृतरीत्या पसरलेले आहे. सहकार क्षेत्रामुळे महाराष्ट्राच्या विकासाला बऱ्याच प्रमाणात चालना मिळाली असली, तरीही आजच्या परिस्थितीत सहकार तत्त्वाच्या नावाखाली सुरू असलेल्या त्रुटीकडे डोळेझाक करून चालणार नाही. आज साखर कारखान्यांचे उदाहरण घेतले तर लक्षात येते की राज्य सरकारच्या किंवा राजकारणातील बड्या नेत्याच्या ओळखीचा माणूस साखर कारखान्यांचा प्रस्ताव देतो. याच कारखान्याच्या प्रस्तावास मंजूरी मिळते आणि दुसरीकडे राज्य सहकारी बँकेकडून (राजकीय नेत्याच्या सांगण्यावरून) या साखर कारखान्याचे भाग भांडवल मंजूर केले जाते. साखर कारखाना सहकारी असल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्याकडूनही निधी उभारला जातोच. यामध्ये जो प्रवर्तक आहे त्याच्या खिशाला कुठलीही खोट सहन करावी लागत नाही. उलटपक्षी सहकार सम्राट म्हणन राजकीय दबाव निर्माण करायला हे प्रवर्तक सरकारी यंत्रणांचाच वापर लोकांच्या विरुद्ध करताना महाराष्ट्रात आज दिसत आहे.

महाराष्ट्रात 'बिना सहकार नही उद्धार' अशी घोषणा जरी रुजली तरी ती नैतिक दृष्ट्या असफल ठरल्यामुळे आज सहकाराच्या नावावर निर्माण होणाऱ्या संस्था या वरीलप्रमाणे (साखर कारखाने) राजकीय नेत्यांना आणि त्यांच्या जवळच्या लोकांना चरण्यासाठी असलेली कुरणं बनत चालली आहेत. कारण, या संस्था राजकारणासाठी पैसा पुरवितात आणि राजकारणी यांना संरक्षण देतात. परंतु या सावळ्या गोंधळामध्ये सामान्य जनतेचे शोषण मात्र निरंतर चालू आहे. महाराष्ट्रामध्ये ग्रामीण भागातील राजकारण या सहकारी संस्थाच्या जोरावर सुरू असते. सहकारी बँका, दूधसंघ इ. पैसे कमविण्याची केंद्रे बनली आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय देताना लोकांच्या हिताचा विचार करण्याची गरज होती. कारण 'सहकार' हा शब्दच सूचित करतो की, या यंत्रणेमध्ये सरकार, सामान्य लोक आणि प्रवर्तक यांचा वाटा असणार आहे. त्यामुळे सहकारी संस्था ह्या सामान्य लोकांच्याही तेवढ्याच मालकीच्या आहेत. जेवढ्या त्या प्रवर्तकाच्या आहेत आणि सरकार म्हणजे तरी शेवटी कोण? लोकच. त्यामुळे आज जर अशा संस्था माहिती अधिकारांच्या कक्षेत आपण येऊ देणार नसू तर या संस्था चालविणारे प्रवर्तक व राजकारणी सरकारला दिवाळखोरीत काढल्याशिवाय राहणार नाहीत.

जागतिकीकरणाच्या आणि खाजगीकरणाच्या आजच्या युगात सहकारीक्षेत्राचे खाजगी करण्याचे जोरदार प्रयत्न याच लोकांकडून मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. म्हणजे सरकारी आणि गुंतवणूकाराच्या पैशाने संस्था काढायची, सरकारची देणी बुडवायची आणि पुन्हा सरकारलाच देणी भागविण्यासाठी पैसे मागायचे, हे उद्योग आज सर्रास सरू आहेत. संस्था तोट्यात गेली, म्हणून तिचे खाजगीकरण करायचे आणि सहकारी संस्था खाजगी झाली रे झाली, की लगेच नफ्यात आणायची. या सगळ्या गोष्टी आज प्रवर्तकाकडून नियंत्रित केल्या जातात आणि लोकांच्या पैशाचा गैरवापर करून कोट्यांची कमाई राजकारणी आणि त्यांचे आप्तस्वकीय ऐकमेकांच्या सहकार्याने या संस्थाच्या नावावर करीत आहेत.

या सर्व गोष्टींचा उहापोह सर्वोच न्यायालयाने एवढा महत्त्वाचा निर्णय देताना करावयास हवा होता; परंतु तसे झालं नाही. या लोकशाही प्रधान देशामध्ये लोकांचे हित महत्त्वाचे आहे आणि त्यासाठी म्हणून तरी आजच्या सहकार क्षेत्राला (राजकारणी / प्रवर्तकांच्या क्षेत्राला) अभय देणाऱ्या ह्या निर्णयाचा लवकरच पुनर्विचार व्हावा एवढीच अपेक्षा.

**– प्रा. एम. डी. बनसोडे**
सहा. प्राध्यापक
विधी महाविद्यालय
ठाणे

●●●

मनाची ऊर्जा अती तीव्र असते.

# साहित्य-जगत

*श्री. शरद जोशी यांची वाचनसाधना अखंड चालू असते. त्यांनी करून दिलेला हा आणखी एक परिचय - संपादक*

**'वाळूत उमलेले फूल' - ले. डॉ. श्रीकांत मुंदरगी**

संकटांशी, दुःखाशी लढण्याचे बळ देणारी, हृदयाचा ठाव घेणारी एक अविस्मरणीय जीवनकथा.

कै. राजेंद्र कुलकर्णी (सं 'धनंजय चंद्रकांत') हा एक अत्यंत धडपड करणारा निष्ठावान संपादक २५-४-१२ हा त्याचा मृत्युदिन. त्याचा पहिला स्मृतिदिन. या निमित्ताने २५-४-२०१३ रोजी त्याच्या पत्नीने नीलिमाने त्यांच्या राजेंद्र प्रकाशन (महाराजा बिल्डिंग, पहिला मजला, गिरगाव, मुंबई - ४००००४, दूरध्वनी - २३८२३५४८, २८३३२४०६) संस्थेतर्फे हे पुस्तक (पृ २११, मूल्य रु.२००/-) प्रसिद्ध केलं. लेखक डॉ. श्रीकांत मुंदरगी, 'शिल्पसंकेत' नागाळा पार्क, श्रीमातोश्री गणेश मंदिरामागे, कोल्हापूर - ४१६००३.

सोमालियाच्या (पूर्ण नाव सोमाली डेमॉक्रॅटिक रिपब्लिक) या अत्यंत गरिबी देशाच्या गायकायो या लहान खेड्यात १९६५ मध्ये वारीस या मुलीचा जन्म झाला. या देशाचं क्षेत्रफळ ६,३७,६७५ चौरस मैल एवढं आहे आणि लोकसंख्या साधारण एक कोटीच्या आसपास. मूळ सोमाली रहिवासी हे काळे आफ्रिकन लोक. त्यांची संख्यासुमारे ८५ लाख तेथे प्रामुख्याने सोमाली नावाची अगम्य वाटणारी भाषा बोलली जाते. सुन्नी मुस्लीम पंथाचे तेथे प्राबल्य आहे. फिरस्त्या होळीवाल्यांच्या जमातीत तिचा जन्म झाला. तिथली निम्मी-अर्धी मुलं जन्माला येताच मरून जातात किंवा मृतावस्थेत जन्माला येतात. भीषण दारिद्य्र. दिवसभर रणरणते ऊन आणि रात्री कडाक्याची थंडी पाऊस कचितच पडतो. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांची वानवा स्त्रियांवर अत्याचार करण्याची जणू काही परंपरा असणारा देश.

**क्रूर आणि कराल दुःख**

एका छोट्याशा झोपडीत ती जन्मली. क्षितिजापर्यंत पसरलेल्या रखरखीत, वैराण आणि रुक्ष वाळवंटात शेळ्यांची राखण करत ती मोठी झाली. उंटाचं दूध हेच तिच अन्न. काही खावसं वाटलं तर जवळपासच्या झाडा-झुडपाचा पाला खायचा, चूल पेटविण्यासाठी तापलेल्या वाळूवरून मैलोगणती फिरून सरपण गोळा करावं लागायचं. कधी सातूची लापशी खायची. वारीसनं भोगलेल्या या भयभीषण नरक यातनांची आणि नंतर तिच्या आयुष्यात झालेल्या परिवर्तनाची कथा 'रीडर्स डायजेस्ट'च्या एका अंकात प्रसिद्ध झाली. ती कथा त्रोटक आणि तुटक असावी, असं डॉ. मुंदरगींना वाटलं. या मुलीच्या जीवनकथेचा बराच मोठा भाग त्या कथेत आलेला नाही म्हणून त्यांनी इंटरनेटच्या माध्यमातून तिची सर्व इत्थंभूत माहिती मिळविली आणि मग सत्याचा अपलाप न करता, काही पात्रांना कल्पनाशक्तीचा साजशृंगार चढवून प्रस्तुतची कादंबरी तयार केली.

**पिरेल्ली कॅलेंडर**

पिरेल्ली कंपनीच्या 'कॅलेंडर झळक' हा एक आंतरराष्ट्रीय ख्यातीचा बहुमान समजला जातो. हे कॅलेंडर तसं दुर्लभच समजतात. त्याच्या मोजक्याच प्रती सुमारे १५/२० हजार निघतात. हे कॅलेंडर बाजारात विक्रीसाठी

ठेवलं जात नाही. काही लबाड, लुच्च्या लोकांनी या कॅलेंडरच स्मगलिंग करून ती लाखालाखाला विकल्याचीहि उदाहरणं आहेत. या कॅलेंडरच्या मुखपृष्ठासाठी तिची निवड झाली आणि तिचं सारं जीवनच पार बदलून गेलं.

**भीषण भविष्यापासून पलायन**

पिरेल्ली (इटलीच्या मिलनि सुदरी कं.चे हेड ऑफिस) या कॅलेंडरवर ती झळकली कशी? तेथपर्यंतचा तिचा प्रवास मोठा रोमहर्षक आहे. वारीसची बहीण अमान पंधरासोळा वर्षाची असतानाच तिच्या बापानं एका व्यसनी माणसाशी लग्न करण्याचा घाट घातला होता. म्हणून आईनं तिला पळून जायला मदत केली. त्याप्रमाणे वारीसलाही तिनं अशीच मदत केली. आई म्हणाली, 'सूर्य उगवतो त्या दिशेला पळत सूट. या अफाट वाळवंटातून जगन वाचून मोगादिशला (शहराचं ठिकाण) पोहचलीस तर अमानला शोधून काढ.' वाळूच्या टेकड्यांमागून टेकड्या ओलांडताना तिला परमावधीचे कष्ट पडले आणि ती मोगादिशेला पोहचली व योगायोगाने तिची अमावशी गाठ पडली. मग नोकरीसाठी वणवण.. तिच्या सहारु मावशीकडे ती गेली. तेथून ती महंमहअंकलकडे (जे लंडनला सोमालियाचे राजदूत होते) आली. मग महंमदअंकल मोगादिशेला गेले. पण त्यांच्याबरोबर ती गेली नाही. मग एका कापडाच्या दुकानात गेली असताना, सोमालियाच्याच हालवू या बाईची योगायोगाने भेट झाली. तिने तिला खूप मदत केली. नंतर तिचे फोटोसेशन झाले. ॲनी मार्शल या स्त्रीने ही तिला खूप मदत केली इ. इ.

**वाटचाल प्रकाशाकडे – वाटचाल वैभवाकडे**

पिरेल्लीच्या कॅलेंडवर तिचे छायाचित्र झळकल्यावर ती एकदम जगप्रसिद्ध झाली. देशोदेशीच्या प्रमुखांनी जगप्रसिद्ध फॅशन्सच्या दुकानांतून तिला भेट देण्यासाठी बोलावणी आली. लाखोलाखो डॉलर्स तिला मिळू लागले. ब्रिटनच्या राणी एलिझाबेथ, व्हॅटिकन सिटीच्या पांपनी तिचा गौरव केला. बीबीसीवर तिचा कार्यक्रम झाला आणि जादूची काडी फिरावी असा बदल होऊन तिला जागतिक कीर्ती प्राप्त झाली. सोमालियात ती गेली असताना एका जाहीर कार्यक्रमात सोमालियाचे उपाध्यक्ष म्हणाले, 'आजवर जगाला हा नगण्य देश जगाच्या नकाशावर नीट दाखवताही आला नसता. त्याच्या अस्तित्वाची दखलही इतर देशांनी घेतली नव्हती. वारीसमुळे जगाला सोमालियाची दखल घ्यावी लागली आहे. तिने हाती घेतलेल्या महान कार्याला आमच्या लाखलाख शुभेच्छा. आम्ही आता जगाला सांगू की वारीस सोमालियाची सुकन्या आहे. अशाच तऱ्हेचा गौरव जगातील साऱ्या टी.व्ही., रेडिओ, वृत्तपत्रे नियतकालिकांनी आणि अनेक देशांच्या प्रमुखांनी केला आहे.

**अत्यंत हुशार व्यक्तिमत्व**

एका पत्रकारानं तिला बालपणाविषयी, तुमच्या देशाविषयी आणि कौटुंबिक पार्श्वभूमीबद्दल काही सांगण्याची विनंती केली तेव्हा ती म्हणाली, ''जगाला दिखाऊपणाची आवड असते. झगमगाट आवडतो. लखलखाट आवडतो. त्यांना प्रकाश आवडतो. अंधार कुणालाच आवडत नाही. टॉर्च लाइट्सच्या प्रखर प्रकाशातले मुखवटे सर्वांना आवडतात. त्यामागे काळोखात वावरणारे चेहरे मात्र नकोसे असतात. ऑल दॅट ग्लीटर्स इज गोल्ड. चकाकते सोने असतं अस वाटतं असतं. पण कधी कधी ते पितळही असू शकतं, नाही का?''

शाळा हा शब्दसुद्धा तिला माहीत नव्हता. अशा या अनपढ, गावरान मुलीनं इंग्लीशवर मोठे प्रभुत्व मिळविले. अस्खलित भाषणांतून उत्तमोत्तम विचार ती मांडू लागली. बीबीसीने तिच्यावर 'अनोमॅड इन न्यूयॉर्क' हा लघुपट केला.

लघुपटानं जगातल्या सर्व खंडातून तिचं नाव दुमदुमलं. 'मेरी क्लेअर' या फॅशनला वाहिलेल्या ख्यातनाम मासिकानं वारीसची लॉरा जिव्हा हीनं घेतलेली मुलाखत प्रसिद्ध केली. तेंव्हा अक्षरशः चमत्कार झाला, 'मेरी क्लेअर'च्या कार्यालयात शंभरावर फोन लाइन्स होत्या त्या सर्व एकापाटोपाठ खणखणू लागल्या. एका रात्रीत लॉरा झिव्ह ही पत्रकारितेतील सुपरस्टार बनली. 'फिमेल जेनायटलम्युटिलेशन (एफ.जी.एम.) या अनिष्ट प्रथेचा निषेध करणारे ठराव युरोप, अमेरिका, आफ्रिका, आशिया इ. अनेक भागातील मानवाधिकार संघटनांनी तातडीच्या बैठका घेऊन केले व ते युनोकडे पाठवून दिले. वयाच्या तेहतिसाव्या वर्षी तिने इंग्रजीत आत्मचरित्र लिहिले. त्याचं नाव 'डेझर्ट फ्लॉवर' हॉर्पर कॉलीन्स या विश्वविख्यात प्रकाशकाने ते प्रसिद्ध केल. त्याची अफाट विक्री झाली. त्याच्या आवृत्त्यांमागून आवृत्त्या निघाल्या. जगांतील अनेक भाषांतून त्यांची भाषांतरे झाली. बेस्ट सेलर खणाच्या पहिल्या दहा पुस्तकांच्या यादीत ते नाव कित्येक वर्षे टिकून राहिले. (या आत्मचरित्राशिवाय आणखीही ४/५ पुस्तके तिने लिहिली.) अमेरिकेच्या पार्लमेंटमध्ये खास सभा भरविली गेली त्यांची सांगता करताना अहमद म्हणाले,' यू.आर नॉट अलोन इन फायटिंग अगेन्स्ट धिस एव्हिल ऑफ एफनीएम बट एन्टायर अमेरिका इज विथ यू. विथ ऑल इटस माइट ॲन्ड मनी' आपल्या अचाट कर्तृत्वाने तिनं जगातील साऱ्या माणसांना चकित करून सोडल. आपल्या कोट्यवधी डॉलर्सचा उत्पन्नाचा बहुतांश भाग अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी व इतर सामाजिक कार्यासाठी दिला. त्यामुळे ती साऱ्या जगात वंदनीय ठरली. आपल्या भारतीय परंपरेनुसार तिचं नाव प्रातःस्मरणार्थ ठरले. खरोखरच धन्य धन्य तिच्या कर्तृत्वाची! प्रत्येकाने ही जीवनकथा अवश्य वाचावी. साऱ्या भारतीय भाषांतून तिचा अनुवाद व्हावा. सर्व ग्रंथालयांनी ही अविस्मरणीय गाथा आपल्या संग्रही ठेवावा. धन्यवाद, लेखक श्री. मुंदरगी व राजेंद्र प्रकाशन यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**
५, अमर कल्पतरू सोसायटी,
देवी चौक, शास्त्रीनगर,
डोंबिवली - ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६९६७

●●●

## पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावे ।
तोषोनि मज द्यावे । पसायदान हें ।। १ ।।

जे खळांची व्यकटी सांडो । तया सत्कर्मी रति
वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचे ।।२ ।।

दूरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो जो
जे वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।

वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।। ४ ।।

चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे
गांव । बोलते ते अर्णव । पीयूषाचे ।। ५ ।।

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।ते
सर्वाही सदा सज्जन । सोयरे होतु ।। ६ ।।

किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिही लोकीं
।भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।।७ ।।

आणि ग्रंथोपजीविंये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्ट विजयें । हो आवें जी ।। ८ ।।

येथ म्हणे विश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखया जाला ।। ९ ।।

# परिसर वार्ता

**– संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

- डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेचा निकाल ९५% लागला.
- रविवार २४/११/१३ रोजी ठाणे जिल्हा स्तरीय बाल साहित्य संमेलनात आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांचा सहभाग.
- राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद अंतर्गत आपल्या शाळेच्या प्रकल्पाची राज्य पातळीवर निवड होऊन राष्ट्रीय पातळीवर निवड झाली.
- दि. ३१/१०/२०१३ रोजी ठाणे जिल्हा जिम्नॅस्टीक असोसिएशनच्या स्पर्धेत राज्य पातळीवर, त्यानंतर महाराष्ट्र ॲम्युचर जिम्नॉस्टिक असोसिएशनने २३ व २४ नोव्हेंबर ला २४ वी रिदमिक जिम्नॅस्टिक राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून कु. यशिता दिगंबर परब हिची राष्ट्रीय पातळीवर निवड झाली.




**महाराष्ट्र ॲम्युचर जिम्नॉस्टिक असोसिएशन आयोजित 'रिदमिक जिम्नॅस्टिक राज्यस्तरीय स्पर्धा २०१३-२०१४' कु. यशिता दिगबंर परब राष्ट्रीय पातळीवर निवड**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

**ब्राझील येथे आयोजित केलेल्या २८ व्या मोस्ट्रॅक विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रदर्शनाचा निकालः**

आमच्या शाळेचे विद्यार्थी कु. चिनार कोकाजे आणि कु. धवल श्रीश्रीमल तसेच संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर आणि मार्गदर्शक डॉ. सुधाकर आगरकर यांनी दि. २० ते २६ ऑक्टोबर २०१३ रोजी नोवो, हमबर्गो, ब्राझील येथे आयोजित केलेल्या २८ व्या मोस्ट्रॅक विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रदर्शनात सहभाग घेतला. आपल्या शाळेने 'जलविद्युत कार' हा प्रकल्प सादर केला.

२६ देशांमध्ये आपल्या प्रकल्पाने ट्रॉफी व सन्मान प्रमाणपत्र पटकावले. येत्या २०१३-२०१४ शैक्षणिक वर्षातील हे दुसरे आंतरराष्ट्रीय पारितोषिक आहे.

## बांदोडकर विज्ञान विद्यालय

महाविद्यालयातील विद्यार्थी प्रिय व राज्य सरकारचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेले प्रा. प्रकाश संतोष माळी यांना ठाण्याच्या आदर्श प्रतिष्ठानने दि. २७ ऑक्टोबर २०१३ रोजी शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय व वैशिष्ट्यपूर्ण कार्यासाठी 'द्रोणाचार्य' पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला.

**संस्कृत दिनाच्या निमित्ताने कार्यक्रम**

बुधवार दि. ९ ऑक्टोबर २०१३ रोजी महाविद्यालयात 'संस्कृत दिना'च्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे (नृत्य, गायन, एकांकिका, कविता वाचन, ग्रुप डान्स, संस्कृत दिनाचे महत्त्व सांगणारी एक छोटीशी फिल्म) आयोजन करण्यात आले. प्रमुख पाहुण्या म्हणून

ठाणे येथील सुरवाणी ज्ञानमंदिराच्या प्राचार्या सौ. स्नेहल नांदेडकर उपस्थित होत्या.

संस्कृत भाषेने 'शून्याची' व विज्ञानातील अनेक शोध तसेच वैद्यकशास्त्राची माहिती करून दिली आहे. ही मानवजातीला अमूल्य देणगी आहे, असे मत सौ. नांदेडकर यांनी यावेळी व्यक्त केले.

याप्रसंगी मोलाच्या सहकार्याबद्दल प्रा. आठवले व प्रा.धुमाळे यांचे संस्कृतच्या प्रा. सौ. हर्षला वैद्य यांनी विशेष आभार मानले. कार्यक्रमाच्या निमित्ताने उपप्राचार्य प्रा. श्री. काटकर, पर्यवेक्षिका प्रा. सौ. पुष्पा कृष्णन आणि इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच २०० विद्यार्थी हजर होते.

**दुःखद निधन**

आपल्या महाविद्यालयातील ग्रंथालय विभागातील शिक्षकेतर सहकारी श्री. पांडुरंग रत्नू खापरे यांचे गुरुवार दि. १७.१०.२०१३ रोजी वयाच्या ५५ व्या वर्षी दुःखद निधन झाले.

शोकसभा शुक्रवार दि. १८.१०.२०१३ रोजी आयोजित केली होती. महाविद्यालयातील एक मनमिळाऊ व कामसू सहकारी अचानक आजारी पडून निवर्तल्यामुळे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी दुःख व्यक्त केले. श्री. खापरे यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सर्वजण सहभागी असल्याची भावना सर्वांनी व्यक्त केली. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो !

कुणाचाही अकाली मृत्यू मनाला विषण्ण करतो असे होऊ नये म्हणून सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी वेळच्या वेळी तब्येची काळजी घ्यायला हवी व जरूर त्या तपासण्या मधून मधून करून घ्यावयास हव्या; जेणे करून वेळेतच उपाय केले जातील, अशी भावना सर्व कर्मचारी व्यक्त करीत होते.

## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

- लेख प्रसिद्ध : 'ग्राहक संरक्षण निवड' च्या नोव्हेंबर २०१३ च्या मासिक अंकात वि.प्र.मं.चे टि.एम.सी. विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांचा हा लेख प्रसिद्ध झाला.
- वि.प्र.मं. चे टि.एम.सी. विधी महाविद्यालयास दिनांक २८ ऑक्टोबर ते नोव्हेंबर ७, २०१३ पर्यंत दिवाळीच्या सुट्या होत्या.
- मुंबई विद्यापीठाच्या विधी शाळेच्या परीक्षा टि.एम.सी विधी महाविद्यालयामध्ये दिनांक २१ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०१३ या दरम्यान सुरळीत पार पडल्या. दिनांक २८ नोव्हेंबर पासून उत्तरपत्रिका तपासण्याचे काम महाविद्यालयात सुरू करण्यात आले.
- म.प.विधी महाविद्यालय, औरंगाबाद आयोजित दिनांक १६ नोव्हेंबर २०१३ च्या 'राज्य स्तरीय चर्चा सत्रात' महाविद्यालयाचे प्रा. विनोद वाघ यांनी सहभाग नोंदविला. सर्वोच्च न्यायालयाच्या एका निवाड्याविषयी व भारतीय अणिवक्ता मंडळाचा नवीन तपासणी विषयावर सदर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

●●●

**दिशा नियमित वाचा.**

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*

जर भगवंताची स्तुती करता आली नाही तर या सुखाचा उपयोग काय?

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे**. त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

## शैक्षणिक संस्थांचा समुह

| अ.क्र. | संस्थेचे नाव | स्थापना वर्ष |
|---|---|---|
| १ | डॉ. बेडेकर विद्या मंदिर – मराठी माध्यम शाळा<br>(पूर्वीची रजिस्टर्ड खाजगी मराठी शाळा – १९३४) | १९५८ |
| २ | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय<br>(राष्ट्रीय मुल्यांकन व प्रत्यायन परिषद – NAAC तर्फे पुनर्मुल्यांकित – 'अ' वर्ग) | १९६९ |
| ३ | के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय<br>(राष्ट्रीय मुल्यांकन व प्रत्यायन परिषद – NAAC तर्फे पुनर्मुल्यांकित – 'अ' वर्ग) | १९६९ |
| ४ | विप्रमंचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय<br>(राष्ट्रीय मुल्यांकन व प्रत्यायन परिषद – NAAC तर्फे मुल्यांकित) | १९७२ |
| ५ | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था<br>(पूर्वीची औद्योगिक व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था)<br>ISO 9001 : 2008 (SGS - UK), एआयसीटीई मान्यताप्राप्त | १९७३ |
| ६ | सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा | १९७६ |
| ७ | विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन<br>(राष्ट्रीय मुल्यांकन – NBA तर्फे मुल्यांकित एआयसीटीई मान्यताप्राप्त) | १९८३ |
| ८ | विद्या प्रसारक मंडळाचे प्रगत अध्ययन केंद्र | १९९६ |
| ९ | विप्रमंचे तंत्रनिकेतन – माहिती व तंत्रज्ञान केंद्र | २००० |
| १० | विप्रमंचे परदेशी भाषा अभ्यास केंद्र | २००८ |
| ११ | विप्रमंचे संरक्षण व व्यूहरचना अभ्यास केंद्र | २००८ |
| १२ | विप्रमंची लंडन ॲकेडमी ऑफ एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, लंडन | २००९ |
| १३ | विप्रमंचे आंतरराष्ट्रीय शिक्षण व संशोधन केंद्र | २००९ |
| १४ | विप्रमंचे महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर, जिल्हा रत्नागिरी | २०१२ |
| १५ | विप्रमंची दूरस्थ शिक्षण संस्था | २०१२ |

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❋ संपर्क ❋

कार्यवाह
**विद्या प्रसारक मंडळ**
विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.